गुरुवार, २५ जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १६०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 25 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-160 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# इंडिया आघाडीला तडा

## तृणमूल-आपचा 'एकला चलो रे'चा नारा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भाजपच्या विरोधात लढण्यासाठी इंडिया आघाडीच्या माध्यमातून विरोधकांचे ऐक्य घडविण्याचा प्रयत्न झाला. लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपात सहमती घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू असतानाच ममता बॅनर्जी यांनी स्वबळावर लढण्याची केलेली घोषणा आणि त्याचीच री पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी ओढल्याने विरोधकांच्या ऐक्याला तडा गेला आहे. ममतांच्या निर्णयाने इंडिया आघाडीच्या विरोधात वातावरणनिर्मितीला मदतच होणार आहे.**

इंडिया आघाडीची स्थापना झाली तेव्हाच विरोधकांचे कितपत ऐक्य होईल याबाबत साशंकता व्यक्त केली जात होती. पाटणा, बंगळुरू, मुंबईतील बैठकांमध्ये भाजपच्या विरोधात लढण्यासाठी सहमती घडवून आणण्यात आली. सप्टेंबरच्या सुरुवातीला मुंबईत झालेल्या बैठकीत जागावाटपाची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचा निर्णय झाला होता. इंडिया आघाडीच्या मुंबईतील बैठकीतच शक्य असेल तेथेच एकत्र निवडणूक लढण्याचा ठराव करण्यात आला होता. 'शक्य असेल' हा शब्दप्रयोग करण्यात आल्याने भाजपच्या विरोधात देशभर एकास एक उमेदवार उभा करण्याची शक्यता मावळली होती. पश्चिम बंगाल, केरळ, पंजाब आणि दिल्ली या चार राज्यांमध्ये इंडिया आघाडीत सहमती होण्याची शक्यता कमीच होती. ममता बॅनर्जी आणि डाव्या पक्षांनी आघाडी करण्याची शक्यता फेटाळून लावली होती. केरळमध्ये डावे पक्ष आणि काँग्रेसने हातमिळवणी करण्यास ठाम नकार दिला होता. पंजाब आणि दिल्लीत आम आदमी पार्टी आणि काँग्रेसमध्ये एकमत होणे कठीणच आहे. यामुळे ममता बॅनर्जी यांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय जाहीर केला असला तरी ही घोषणा अनपेक्षित नाही. पश्चिम बंगालमध्ये ममता, डावे आणि काँग्रेस हे इंडिया आघाडीतील घटक पक्ष एकत्र येणे शक्यच नव्हते. केरळमध्ये डावे पक्ष आणि काँग्रेस एकत्र लढल्यास भाजपला संधी मिळू शकते. यामुळेच डावे पक्ष आणि काँग्रेसने आधीच इंडिया आघाडीचे घटक पक्ष असले तरी एकत्रित लढणार नसल्याचे जाहीर केले होते.

भाजपच्या विरोधात लढण्याकरिता इंडिया आघाडीला बळ देण्याचा प्रयत्न सुरू होता. काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी इंडिया आघाडीचे नेतृत्व करावे, असा प्रस्ताव ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनीच मांडला होता. यापैकी ममतांनी स्वतंत्र लढण्याचे जाहीर केले. आप आणि काँग्रेसमध्ये सहमती होण्याची शक्यता कमीच आहे. ममतांच्या निर्णयाने इंडिया आघाडीच्या ऐक्याला मात्र तडा गेला आहे. ममतांच्या 'एकला चलो रे' या घोषणेनंतर पंजाबचे मुख्यमंत्री मान यांनीही काँग्रेसबरोबर आघाडी होण्याची शक्यता फेटाळून लावली. इंडिया आघाडीत २८ पक्षांचा समावेश होता. ममता आणि मान यांच्यापाठोपाठ आणखी काही पक्ष वेगळी भूमिका मांडू शकतात. या साऱ्यांचा इंडिया आघाडीच्या ऐक्यावर परिणाम होणार आहे. विरोधी मतांमध्ये होणारे विभाजन शेवटी भाजपच्याच पथ्थ्यावर पडणार आहे.

# मनोज जरांगे यांना हायकोर्टाकडून नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गुणरत्न सदावर्ते यांनी मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाविरोधात हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठापुढे तातडीची सुनावणी झाली. याचिकेवर हायकोर्टाने सुनावणी करताना मनोज जरांगे यांना नोटीस बजावली आहे. सदावर्ते यांच्या याचिकेला उत्तर देण्यासाठी सरकारकडून महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ उपस्थित होते. सदावर्तेंच्या याचिकेवरील सुनावणी दोन आठवड्यांसाठी तहकूब करण्यात आली आहे. दरम्यान, गरज वाटल्यास सदावर्तेंना पुन्हा हायकोर्टात येण्याची मुभा देण्यात आली आहे. आमच्याकडे अद्याप मनोज जरांगे किंवा त्यांच्या कुणाकडूनही आंदोलनाची परवानगी मागणारे पत्र आले नसल्याचे महाधिवक्ता यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले. महाधिवक्ता म्हणाले की, हजारो लोक मुंबईच्या दिशेने येत आहेत हे खरे आहे. त्यांना परवानगी दिलेली नाही. कायदा आणि सुव्यस्था राखणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी आम्ही योग्य तो सारी पावले उचलायला तयार आहोत, पण प्रशासनावर सर्वांचे अधिकार अबाधित राखण्याची जाबबदारी आहे. आम्ही एखादे पाऊल उचलू आणि त्याचे विपरीत परिणाम झाले? तर जबाबदारी कुणाची? हा देखील प्रश्न असल्याची भूमिका राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ यांनी मांडली. हायकोर्टाने कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी तुम्हाला आदेशांची काय गरज आहे? अशी विचारणा केली. यानंतर मनोज जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यास तयार असल्याचे महाधिवक्ता यांनी मुंबई उच्च न्यायालयात सांगितले.



# अखेर डोमेगावात दारुबंदी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** अंबड तालुक्यातील डोमेगावात दारुबंदी करावी, असा ठराव बुधवारी (दि. 24) झालेल्या ग्रामसभेत घेण्यात आला आहे. दारूबंदीचा ठराव घेणारी डोमेगाव ही अंबड तालुक्यातील पहिली ग्रामपंचात ठरली आहे.

डोमेगावातील अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी,या मागणीचे 551 महिला- पुरुषांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन दिनांक 22 नोव्हेंबर रोजी ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आदींना देण्यात आले होते. या निवेदनाची दखल घेत पोलिसांनी गावात अवैध दारू पकडली होती.

दरम्यानच्या काळात डोमेगावात दारुबंदीचा ठराव घ्यावा, या मागणीसाठी 26 जानेवारी रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्याची मागणी ग्रामस्थांनी डिसेंबर महिन्यात सरपंच व ग्रामसेवकांकडे निवेदनाद्वारे केली होती. याकामी ग्रामपंचायतचे पाणी पुरवठा कर्मचारी बाबासाहेब शेळके व सामाजिक कार्यकर्ते गौतम खांडेभराड, सविता शेळके यांनी पुढाकार घेतला होता. अंबडचे तहसीलदार व पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना याबाबत निवेदन दिल्यानंतर उभयतांनी ग्रामपंचायतला ग्रामसभेचे आयोजन करण्याबाबत आदेशित केले होते.

दारूबंदी व गावातील पाणी टंचाई यावर चर्चा करून ठराव घेण्यासाठी डोमेगावात दिनांक 24 जानेवारी रोजी सकाळी 10 वाजता ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेत गावात दारूबंदीचा ठराव पारीत करण्यात आला. दारूबंदीचा ठराव ग्रामसभेत मंजूर झाल्याने गावातील महिला आनंदीत झाल्या आहेत. गावात दारूबंदीचा ठराव घेण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणात पुढे सरसावल्या होत्या, हे विशेष.

आजच्या ग्रामसभेत गावातील महिलांनी दारूबंदीची एकमुखी मागणी केली. या ग्रामसभेस सरपंच डॉ. अशोक काळबंडे,उपसरपंच कल्पना सांगळे, ग्रामसेवक सचिन एखुंडे, पोलीस पाटील नागनाथ गुलगे,माजी सरपंच धोंडीराम काळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष विष्णुपंत सातपुते, ग्रामपंचायत सदस्य कानू चोथे,विमलबाई लहामगे,लक्ष्मण घुले, सविता शेळके, द्वारकाबाई म्हसके,छबुबाई चोथे, गीता चोथे, रत्नाबाई काळबंडे, यशोधा गुलगे, इंदुभाई शेळके, अंजनाबाई खांडेभराड,बाबासाहेब शेळके, गौतम खांडेभराड, जयराम रनमाळे,दत्तात्रय घुळे यांच्यासह ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. या ग्रामसभेत गावातील पाणी टंचाई बाबत करावयाच्या उपाय योजनेबाबत ठराव मंजूर करण्यात आला.

दरम्यान, दारुबंदीचा ठराव ग्रामसभेत मंजूर झाल्याबद्दल गावातील महिलांनी आनंद व्यक्त केला आहे.

# दहावी- बारावी परीक्षेसाठी १० मिनिटे वाढीव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी आता विद्यार्थ्यांना 10 मिनिट वाढीव वेळ मिळणार आहे. परीक्षेची प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी ही वाढीव वेळ मिळणार आहे. महाराष्ट्र बोर्डाने परिपत्रक काढून याबाबतची माहिती दिली आहे. इयत्ता 10 व 12 वीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत. अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा भयमुक्त आणि कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेपासून रद्द करण्यात आलेली होती. तथापि विद्यार्थी हित लक्षात घेवून व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करून सदरची दहा मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर गतवर्षीप्रमाणे फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षांसाठी वेळ वाढवून देण्यात येत आहे.

फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षांची वेळी सकाळ सत्रात सकाळी 11 वाजता वाजता तसेच दुपार सत्रात दुपारी 3 वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल. सकाळ सत्रात सकाळी 10.30 वाजता तसेच दुपार सत्रात दुपारी 2.30 वाजता परीक्षार्थ्यांने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळच्या सत्रामधील 11 ते 2.10, 11 ते 1.10, 11 ते 1.40 अशी वेळ असणार आहे. तर दुपारच्या सत्रातील 3 ते 6.10, 3 ते 5.10, 3 ते 5.40 अशा प्रकारे सर्व पेपरसाठी वेळ 10 मिनिटे वाढवून देण्यात आली आहे.

# प्रशासक कारभारी अन् झोळी रिती : लोकहिताचं वाटोळं

## इलेक्शनमुळे नेत्यांनी कात टाकली !

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर : राज्यातील विधायक आणि लोकाभिमुख योजना विकासाच्या वाटा मोकळ्या करून जनतेला दिलासा देण्याच काम हे प्रशासनाच्या माध्यमातून केले जाते. मागील पाच वर्षांपासून प्रशासन निवडणुकाना स्थगिती देवून 'प्रशासक' कारभारी नेमल्याने विकासाची झोळी रितीच राहिली.. लोकाभिमुख योजना कागदावरच राहिल्याने विकास ठप्प झाला.. राजकीय पुढारी खुर्चीत गर्ग झाली आहेत. आवंदा इलेक्शन व्हणार म्हंजे नेते मंडळी कात टाकल्यागत दिसू लागलीत. इलेक्शन झाल्याने खरा कारभारी ठरणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे. दर पाच वर्षानी लोकसभा आणि विधानसभा निवडणूका घेतल्या जातात पण मागील चार ते पाच वर्षांपासून सदरील निवडणुका झाल्या नाहीत याशिवाय महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकाना हि स्थगिती देवून प्रशासक नियुक्त करून त्याच्याकडे कारभार सोपविण्यात आला. संबंधित अधिकारी 'रिक्स' नको म्हणून विकास कामाची जबाबदारी घेत नाहीत परिणामी जनतेची गळचेपी होत आहे.**

**कारभारी कोण होईल :** ठप्प झालेल्या निवडणकांचा लवकरच बिगुल वाजण्याचे संकेत असल्याने राजकीय पुढारी सावध झाले आहेत . मागील लोकसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना पराभव पत्करावा लागला असुन त्यांच्या तालमीतील भाजपचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी "यशश्री" खेचून आणली . आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत कोण कारभारी ठरणार याकडे नजरा लागून आहेत . खरी लढत भाजप आणि काँग्रेस पक्षातच होणार हे निश्चित आहे .


**आरक्षणाचा पेच कायम :** मागील अनेक दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मूद्दा ऐरणीवर आला आहे .ओबीसी विरूद्ध मराठा असा संघर्ष सुरू आहे .स्थानिक पातळीवर पदाधिकारी, कार्यकर्ते स्वतंत्र मागणीचा पाठपुरावा करून अस्तीत्व सिध्द करण्यासाठी लढत आहेत . याची निवडणुकीत छाप दिसून येईल हे मात्र खरे आहे .

**टंचाई आराखडा कधी :** तालुक्यात पुरेशी सिंचनाची सुविधा नसल्याने उन्हाळ्यात विशेषता ग्रामीण भागात वाडी तांड्यावर पाणी टंचाईचा सामना करावा लागतो .यावर मात करण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी "ग्रीड " योजनेतून प्रत्येक गावात पाणी देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत .जलजिवन मशिनचा बोजवारा उडाला आहे .ऊन्हाळा तोंडावर आला असून अद्याप प्रशासनाने संभाव्य टंचाई आराखडा तयार करणं गरजेचं असताना त्याकडे दुर्लक्ष केले आहे .

**शेती हंगाम धोक्यात :** तालुक्यात कोरडवाहू क्षेत्र आधिक असल्याने बहुतांश शेतकरी निसर्गाच्या पावसावर अवलंबून आहेत .निसर्ग दिवसेंदिवस "लहरी "बनत असल्याने त्यांचा फटका खरीप, रब्बी हंगामातील ऊत्पनाला बसतो आहे .मागील सहा सात वर्षांपासून तीच अवस्था कायम असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे . सरकार केवळ आसवे पुसून मोकळे होतात त्यामुळे ह्रदयातील दू :ख मात्र तसच धूपत असत .कृषीप्रधान देशात त्याना कुणी वाली नाही हि खंत सतत बोचत राहते .

**अंगणवडीत शूकशूकाट :** शासनाने आशा कामगारांच्या वेतनश्रेणीत वाढ केल्याने अंगणवाडी कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष पसरला आहे . त्यांनाही अशीच वेतनवाढ करुन न्याय मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी संप पुकारला आहे .परिणामी कुपोषित बालके आणि ईतर बालकांची गैरसोय होत आहे .अद्याप संपावर तोडगा निघाला नसल्याने अंगणवाडीत शूकशूकाट दिसून येत आहे .

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या लेण्यांमध्ये उत्तर आणि दक्षिण भारतीय शिल्पकलेचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. या परिसरात एकूण चार लेणी असून तीन हिंदू देवतांची असून एक जैन धर्मियांची आहे. सर्वच लेण्या प्रेक्षणीय आहेत. त्याचप्रमाणे ऐहोळे, पट्टदकल येथील पुरातन मंदिरे प्रेक्षणीय आहेत. ही लेणी आणि मंदिरे पाहताना आपल्यासोबत जर गाईड असेल तर त्या लेण्यांचा इतिहास अतिशय सुंदर पद्धतीने आपल्यासमोर उलगडला जातो आणि आपण त्यांचा अधिक आंनद घेऊ शकतो. आपल्याकडे अधिक वेळ असेल तर आपण हम्पी, तुंगभद्रा डॅम आधी ठिकाणी पण पाहू शकतो. शाकंभरी मातेच्या अवताराची कथा अतिशय रम्य आहे. दुर्गम नावाच्या असुराने तपसामर्थ्याच्या बळावर ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या वराने तो अजिंक्य आणि उन्मत्त झाला. इंद्रादी देवांना त्याने पराभूत करून बंदी बनवले. इंद्रादी देव बंदिवासात असल्याने पाऊस पडेनासा झाला. पृथ्वीवर भयंकर दुष्काळ पडला. नद्या, सरोवर, तलाव आटले. विहिरी कोरड्या पडल्या. वनस्पती, मानव आणि पृथ्वीवरील यच्चयावत प्राणी अन्नपाण्याविना तडफडू लागले. देवांना हे पाहवेना म्हणून त्यांनी देवी भगवतीची प्रार्थना केली. या संकटातून आम्हाला सोडावं म्हणून साकडे घातले. अन्नपाण्याविना तडफडत असलेली प्रजा पाहून देवीच्या नेत्रात करुणा दाटून आली. तिने शंभर नेत्र असलेले रूप धारण केले. त्या नेत्रातून कृपारूपी जलधाराची वृष्टी झाली. तहानलेल्या धरतीला त्या जलधारांनी शांत केले. नद्या, सरोवरे,तलाव, विहिरी भरल्या. धरित्रीने हिरवा शालू परिधान केला. अन्नधान्याचा सुकाळ झाला. अनेकविध भाज्यांची निर्मिती झाली. देवीने प्रजेचे दुःख हरण केले. विविध भाज्या म्हणजे शाक निर्मिती तिच्या कृपेने झाली म्हणून ती शाकंभरी झाली.

## निसर्गरम्य श्रीक्षेत्र बदामी



## आनंदी पहाट



### सहजीवनातील सहप्रवासी समाधानी असावा

आधुनिक केसरी

पती-पत्नी हे आयुष्यभराचे सोबती आहेत, जे सामान्य जीवन जगतात; ते दोन जिवलग सहकारी आहेत. प्रत्येकाचे हक्क आणि दर्जा समान आहे. त्यांनी एकत्र काम करावे आणि घरातील व्यवहार एकत्रितपणे हाताळावेत. त्यांनी एकमेकांना राजकारण, काम आणि अभ्यासात प्रोत्साहन तसेच मदत केली पाहिजे. दैनंदिन जीवनात, त्यांनी एकमेकांची काळजी घेतली पाहिजे आणि परस्परांचा विचार केला पाहिजे. त्यांच्या पालकांसाठी, त्यांच्या काळजीची जबाबदारी दोन्ही बाजूंनी उचलली पाहिजे. मुलांच्या संगोपन आणि शिक्षणाच्या संदर्भात दोन्ही बाजूंनी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. परस्पर आदर, प्रेम आणि समान प्रगतीच्या भावनेच्या आधारे पती-पत्नीमधील नातेसंबंध हाताळणे, हे खरे तर पती-पत्नीमधील नातेसंबंधाचे एक नवीन स्वरूप आहे. पती- पत्नीमधील अशा प्रकारच्या नातेसंबंधामुळे दोघांमधील भावना सतत वाढतात आणि त्यांचे जीवन अधिकाधिक आदर्श बनते. आपल्या आयुष्यात पती-पत्नीचे नाते सर्वात महत्त्वाचे असते. आपल्या जीवनात दीर्घकाळ आनंदी राहण्यासाठी हे महत्त्वाचे आहे. जर हे नातं विपरीत परिस्थितीतून जात असेल, तर त्याचा परिणाम आपल्या इतर नातेसंबंधांवरही होऊ शकतो. कधी चांगलं तर कधी वाईट, मग ते काहीही असो, ती सर्व लोकांची गरज असते. आपल्या आयुष्यात पती-पत्नीचं नातं सर्वात महत्त्वाचं असतं. परमात्म्याने हे अतिशय सुंदर नाते निर्माण केले आहे, जेणेकरून दोन्ही जीव एकमेकांवर प्रेम करतात आणि अप्रत्यक्षपणे ते सर्वशक्तिमानावर प्रेम करत राहतात. अशा एखाद्या नात्यात दुरावा निर्माण झाला, तर ते दोन्ही जोडीदारांना एकंदरीत दुखावणारे असते. प्रेम ही जीवनाची गरज आहे आणि तुमच्या जोडीदाराचे विशेष प्रेम हे अत्यंत महत्त्वाचे आहे. दोघेही वेगवेगळ्या ग्रहांशी संबंधित आहेत आणि त्यामुळे वर्तनात फरक नक्कीच असणार आहे. तरीही सहजीवनातील सहप्रवासी समाधानी राहण्यासाठी प्रत्येकाने सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### त्रैलोक्यीचा राजा | पंढरीत ||

एक रूप पाहु | एक गाऊ नाम ||
एक हरिनाम | बोलु वाचे ||१||
एकनिष्ठ भाव | एक चित्ती वसे ||
एक तोचि दिसे | विटेवरी ||२||
एकमेका देऊ | एक प्रेम भाव ||
एक दिंडी ठाव | पांडुरंग ||३||
एक ज्ञाना तुका | एक संतजन ||
एक आलिंगन | विठ्ठलासी ||४||
एक तुझा माझा | नसे अन्य दुजा ||
त्रैलोक्यीचा राजा | पंढरीत ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

पूर्वीं देव नाहीं पुजिला ।वैभव देखोन भुलला ।
सेखीं प्राणी प्रस्तावला ।वृद्धपणीं ॥३५॥
देह अत्यंत खंगलें ।सर्वांग वाळोन गेलें ।
वातपीत उसळलें ।कंठ दाटला कफें ॥३६॥
वळे जिव्हेची बोबडी ।कफें कंठ घडघडी ।
दुर्गंधी सुटली तोंडीं ।नाकीं स्लेष्मा वाहे ।३७॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

विद्या अल्प जो पुण्य रत,
त्यागवन्त क्षमवान ।
दयावान गुरु सेवक, मध्यम सो
पहिचान ।।०६।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/०६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मध्यम श्रेणीचा जिज्ञासू तो आहे,
जो कमी शिकलेला आहे परंतू शुभ
कर्मांमध्ये संलग्न आहे, तसेच त्यागी,
क्षमाशील, दयाळू आणि सद्गुरु-
सेवक आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

पुष्प ६२वे

आधुनिक केसरी

मातोश्रींचे उत्तरकार्य आटोपले ।
श्रीमहाराज इंदूर मुक्कामी आले ।जुनी माणसं
पुन्हा भेटले ।त्यांना या वास्तव्यात ।।१।।
किसनराव नामे व्यक्ती ।ज्याची होती मोठी
अपकीर्ती ।तो व्यवहारी विक्षिप्त अती ।
म्हणे- भविष्य सांगावे माझे,
अन थट्टा करी श्री महाराजांची ।। २ ।।
विनये बोलती महाराज त्याला ।
रामनामची ठावे आम्हाला।
बाकी ज्ञान नसेल ही आम्हाला ।
रामदासी आम्ही बरे ।। ३।।
किशनरावाचे नशीब खडतर ।
विपरीत घडले भयंकर ।
गोदूच्या भविष्यापरी खरोखर ।
आले प्रत्यंतर ।या रावसाहेबाला ।। ४ ।।
कळवळून रावसाहेब बोले ।उघडले हो माझे
डोळे ।ऐकीन तुमचे या पुढले ।
गुंतवीन मना "रामनामात ।।५।।
वृत्तीत फरक पडला । रावसाहेब नीट वागू
लागला ।समस्त जन त्यास म्हणू लागला।
भगत किसनराव ।। ६ ।। किर्ती महाराजांची
अधिक वाढली। साधुवरती या लोकांची श्रद्धा
बसली ।जपमाळ हाती, नाम घेऊ लागली।
भक्तमंडळी महाराजांच्या संगे ।। ७ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## शुद्ध वातावरण व पवित्र आचरण

आधुनिक केसरी

आपल्या घरातले वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे. आपल्याकडे येणाऱ्या माणसाला परत जाऊच नये असे वाटावे. अगदी भगवंताच्या इच्छेने प्रपंच चालला आहे असे समजून, त्या प्रपंचात विद्या, वैभव, घरदार इ. सर्व काही यश संपादन करा; अगदी एखाद्या राजयोग्याप्रमाणे प्रपंचात ऐषआरामात राहून गाद्यागिरद्यांवर लोळा; पण हे करीत असताना तुमचे अंतःकरण मात्र भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेले राहू द्या. कोणाशी वाद घालीत बसू नका. जगाचा मान फार घातक आहे; त्याची चटक लागली की मनुष्य त्याच्यामागे लागतो, नंतर मान मिळविण्याची कृती थांबते आणि मानही नाहीसा होतो. जगातले अजिंक्य पुरुषसुद्धा कुठेतरी विषयात गुंतलेले असतात, तिथे त्यांचा घात होतो. जगाला ते भारी असतील, पण त्या विषयापुढे त्यांचे काहीच चालत नाही. प्रेमात गुंतू नका, तसे द्वेषमत्सरातही गुंतू नका; दोन्ही सारखेच घातक आहेत. आपला प्रिय नातेवाईक मेला, आणि आपण ज्याच्यावर दावा लावला आहे तो



भाऊबंद मेला; दोघेही मेल्याचे सुतक सारखेच ! त्याचप्रमाणे, मनुष्य प्रेमाने गुंतला काय आणि द्वेषाने गुंतला काय, नुकसान सारखेच होते. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्याने तो होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे होवो. ढोंग, बुवाबाजी इ. च्या भानगडीत तुम्ही पडू नका; अगदी काहीही न केलेत तरी चालेल, पण ढोंग मुळीच करू नका; आणि सर्वांनी माझ्यावर कृपा करा, अगदी अनुभवाने मी सांगतो, की बुवा होण्याच्या फंदात तुम्ही पडू नका. आपले कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करून, त्याचे अनुसंधान अखंड टिकू द्या. आमची अशी वृत्ती बनण्यासाठी संतांच्या संगतीची आपल्याला जरुरी आहे. आपण सर्वजण सत्संगतीमध्ये आहोत असे म्हणतो, मग आमची वृत्ती का न सुधारावी ? तर संतांना ज्याची आवड आहे ते आम्ही धरले नाही, म्हणून आमची वृत्ती सुधारत नाही. श्रीकृष्णाने उद्धवाला ज्ञान देऊन त्याला गोपींकडे पाठविले. भगवंताच्या नामामध्ये त्या रंगून गेल्या होत्या. गोपींचे नामावरचे प्रेम पाहून उद्धवाला आश्चर्य वाटले. नामामध्ये त्यांना भगवंत दिसत असे; ते पाहून उद्धवाने देवाला सांगितले, “ देवा, तू मला ज्ञान दिलेस खरे, पण तुझ्या भक्तीचे प्रेम त्याहून श्रेष्ठ आहे, ते तू मला दे. ” खरोखर, त्या नामाचे माहात्म्य देवाच्या वर्णनापेक्षाही कठीण आहे. तुम्ही सर्वजण इथे आला आहात; इथून रामाजवळून काही मागून न्यायचेच असेल तर त्या नामाचे प्रेम तुम्ही सर्वांनी मागा. सर्वांनी नामस्मरण करा आणि आनंदात राहा. राम कृपा करील, हा भरवसा बाळगा. १३०. आपल्या जीवनात सहजता हवी. सहजतेमध्ये समाधान आहे.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

एका वर्षांत तो सर्व विद्येंत निपुण झाला. नंतर त्यास मधुब्राह्मणांकडे पाठवून दिलें. पुढें त्या ठिकाणीं बहुत दिवसपर्यंत राहून शके दहाशें या वर्षीं त्यांनीं समाधि घेतल्या. कबरीच्या घाटाच्या समाधी बांधण्याचा मुख्य मुद्दा हाच होता की, पुढें यवनराजाकडून उपद्रव होऊ नये. एकदांऔरंगजेबबादशहाने ह्या समाधी कोणाच्या आहेत **क्रमशः**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, २५ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari

# मुलीच्या लग्नासाठी पैसे हवेत : आई मिरची तोडायला गेली अन् घडला अनर्थ

आधुनिक केसरी न्यूज

**धनंजय साखरकर**

**चंद्रपूर :** ज्या घरात लंग्नसोहळ्याचं आनंदी वातावरण असायला हवं होतं, त्या घरावर दुःखाचे गडद सावट पसरलं. दोन महिन्यानंतर मुलीचं लंग्न ठरलेलं. कुटुंब पै पै जोडत होता. अश्यात मिरची तोडायला गेलेल्या महिलेवर काळाने घाला घातला. आज त्या महिलेचा मृतदेह सापडला.मृतदेह बघताच मुलीनं एकच टाहो फोडला. तिच्या डोळ्यातून वाहणारे अश्रू बघून पाषाणाचे डोळे ओले झालेत.केवळ कुटुंबावरच नाही तर अक्ख गाव दुःखात बुडाले. चंद्रपूर-गडचिरोली सीमेवर नाव दुर्घटना घडली. यात सहा महिलांचा दुदैवी मृत्यू झाला. या घटनेने दोन्ही जिल्हावर शोककळा पसरली आहे.आज रेवंता हरीचंद्र झाडे यांच्या मृतदेह सापडला रेवंता झाडे यांची मुलगी काजल हिचा एप्रिल महिन्यात विवाह ठरला आहे. चंद्रपूर-गडचिरोली जिल्हात शेतमजुरांचा हाताला काम नाही. त्यामुळं या दोन्ही जिल्हातील नागरिक थेट राज्याची सीमा ओलांडून रोजगाराला जातात. सध्या मिरची तोडण्याचा हंगाम सुरु आहे. चंद्रपूर-गडचिरोली जिल्हातील हजारो शेतमजूर तेलंगणा राज्यात मिरची तोडायला गेले आहेत. काही मजूर इत्तर जिल्ह्यात स्थलांतरित झाले आहेत.अश्यात गडचिरोली जिल्हातील गणपूर येथील शेतमजूर पोटाची खडगी भरण्यासाठी वैनगंगा नदी पात्रातून नावेने चंद्रपूर जिल्हातील गंगापूर टोक शेतशिवारात मिरची तोडायला निघालेत.मात्र काळ त्यांच्यावर टपला होता. नदी पात्राचा मध्यभागी नाव येताच नाव बुडाली. या दुर्घनेत सहा महिलांचा दुदैवी मृत्यू झाला. मंगळवारला दोन महिलांचा मृतदेह सापडले होते. आज पहाटेला रेवंता झाडे या महिलेचा मृतदेह सापडला आहे. रेवंता झाडे यांची मुलगी काजल हिचं लग्न जुडलं आहे.28 एप्रिल लग्नाची तारीख ठरवल्या गेली. मुलीचं लग्न ठरल्याने घरात आनंदी वातावरण होते. लग्नासाठी पैशाची जुळवाजुळव सुरू होती. इतरांच्या शेतात कुटुंब मजुरीसाठी जात होते. मंगळवार ला रेवंता झाडे या मिरची तोडण्यासाठी नावेने निघाल्यात. मात्र नाव बुडाली. यात त्यांचा दुदैवी मृत्यू झाला. नाव दुर्घटनेची माहिती मिळताच झाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. मुलगी काजल हिने टाहो फोडला. तिचा टाहो बघून गाव गहिवरला.आज पहाटेला रेवता झाडे यांचा मृतदेह सापडला.ज्या हाताने मुलीला हळद लावायची होती, तीला सजवायच होतं. ते हात थंडगार पडले होते.



# गुंगीकारक औषधी बाटल्यांसह दोघे जेरबंद



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, मोहमंद शाह अहमद शहा राहणार मिठी खाडी सुरत हा त्याच्या कब्ज्यात मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवुन आणणा-या गुंगीकारक औषधाच्या बाटल्यां बाळगुन असुन सदरच्या बाटल्या तो शोएबखान अजीज खान पिंजारी राहणार धुळे यास चोरटी विक्री करण्यासाठी धुळे शहरात रेल्वे स्टेशन परिसरात आलेला असल्याची अशी बातमी मिळाली. त्या अनुषंगाने पीएसआय प्रकाश पाटील यांनी पथकासह रेल्वे स्टेशन परिसरात शोध घेत असता, रेल्वे स्टेशन समोर रोडच्या बाजुला एक इसम आपल्या कब्ज्यात एक पांढ-या व जांभाळया रंगाच्या प्लॅस्टीक गोण्या बाळगतांना दिसला. त्याच दरम्यान एक इसम त्याच्या ताब्यातील रिक्षाने त्याच्या जवळ आला व ज्याच्या ताब्यात गोण्या होत्या त्या इसमाने सदर गोण्यात असलेले बॉक्स बाहेर काढून त्यास देत असल्याचे दिसल्याने त्यांचा वाजवी संशय आल्याने त्यांच्यावर  जागीच छापा टाकुन त्यांना पकडले. त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांची नांवे मोहमंद अहमद शहा वय ३८ राहणार मिठाखाडी, निंबायत, आझाद चौक, नुराजी मजीद, सुरत व शोएबखान अजीज शहा पिंजारी वय ३४ राहणार चाळीसगांव रोड, गजानन कॉलनी, धुळे असे असल्याचे सांगीतले. त्यांच्या कब्ज्यात ५३ हजार,५५० रुपये किंमतीचे क्लोडीन फॉस्पेट क्लोरफेनिरामाईन मिलेट अँड सोडिअम सिट्रेट कफ लिंक्टस १०० मिलीलिटरच्या ११९ बाटल्या तसेच कोडीन फॉस्पेट अँड ट्रायपोलीडीन हायड्रोक्लोराईड कफ लिंक्टस १०० मिलीलिटरच्या २३८ बाटल्या अशा एकूण ३५७ प्रत्येकी किंमत १५० रूपये प्रमाणे असलेल्या बाटल्या तसेच ६० हजार रुपये किंमतीची एम.एच.१८ ए.जे. ६०२७ या क्रमांकाची रिक्षा असा एकुण १ लाख १३ हजार ५५० रुपयांचा मुद्येमाल मिळुन आला. त्यांच्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पीएसआय प्रकाश पाटील, एएसआय संजय पाटील, शाम निकम, पोलीस हेड कॉस्टेबल संदीप पाटील, सुरेश भालेराव, रविंद्र माळी, संतोष हिरे, पोलीस नाईक रविकिरण राठोड, पोलीस कॉंस्टेबल गुणवंत पाटील, निलेश पोतदार, सुशिल शेंडे, सागर शिर्के, हर्षल चौधरी, चालक हेड कॉंस्टेबल कैलास महाजन यांनी केली.

# गवई यांच्याकडून दिव्यसेवा प्रकल्पाला किराणा भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** शहरापासून अवघ्या ११ किलोमीटर अंतरावर असलेल्या वरवंड येथे अशोक काकडे हे मनोरुग्णांची सेवा करत असतात,या त्यांच्या दिव्यसेवा प्रकल्पामध्ये दीडशे पेक्षा जास्त मनोरुग्ण आज आहेत व त्यांचा ते स्वखर्चातून लोकांच्या मदतीतून सेवा करत असतात त्यांचा औषध खर्च दवाखाना सर्वच ते करत असतात,ज्या लोकांनी मनोरुग्णांना नाकारले आहे त्या लोकांचा आज दिव्यसेवा प्रकल्पामध्ये सांभाळ होत आहे. शासन स्तरावर कुठल्याही प्रकारचे मदत नसताना अनेक लोक दिव्य सेवा प्रकल्पाला अन्नधान्य तर कोणी किराणा भेट म्हणून देत आहेत, असेच सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा येथील सामाजिक कार्यकर्ते अमोल गवई यांनी दिव्य सेवा प्रकल्पाचे संचालक अशोक काकडे यांना किराणा सामान भेट म्हणून दिले. यामध्ये तेल रवा साखर मुंग डाळळ तुरदाळ कपडे इत्यादी वस्तूंचा यात समावेश आहे. यावेळी त्यांच्यासोबत पत्रकार डी डी गवई यांच्यासह इतर नागरीक उपस्थित होते.





# डाळिंब व मोसंबी पिकावरील प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील  कापूस वडगाव येथे तालुका कृषी विभागाच्या वतीने डाळिंब व मोसंबी पिकावरील प्रशिक्षण कार्यक्रम  संदीप थोरात यांच्या शेतावर पार पडला या प्रसंगी  बदनापूर येथील कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर दीपक कच्छवे यांनी डाळिंब व मोसंबी पिकावर लागवडीपासून ते फळ काढणे पर्यंत मार्गदर्शन केले यामध्ये जमिनीची निवड ,माती परीक्षण, निरोगी कलमांची निवड ,लागवड वेळी रासायनिक व जैविक खते व शेणखताचा वापर करून खड्डे भरणे व नंतर निरोगी कलम लागवड करणे .मोसंबी व डाळिंब पिकावरील विविध किडी व रोग यामध्ये फळमाशी ,खोडकिडा ,फळ पोखरणारी आळी ,फुल किडे ,पिठ्या ढेकूण, सिट्रस सायला ,लाल कोळी तसेच रोगांमध्ये सिट्रसग्रीनिंग, डिंक्या रोग ,तेल्या रोग, मर रोग, खत व्यवस्थापन ,पाणी व्यवस्थापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.उप विभागीय कृषी अधिकारी अशोक आढाव यांनी पिकाच्या गरजेनुसार आवश्यक असलेली मुख्य अन्नद्रव्य व सूक्ष्म अन्नद्रव्य सोबत द्यावेत तसेच ठिबक सिंचनातून विद्राव्य खतांचा वापर करावा व आपल्या बागेचे दररोज निरीक्षण करून योग्य रीतीने व्यवस्थापन करून निर्यात क्षम फळे तयार करावेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक मीना पंडित यांनी केले तर आभार प्रदर्शन कृषी पर्यवेक्षक माधव गांगुर्डे यांनी केले. कार्यक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पाडला या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच नानासाहेब थोरात, गोरख थोरात ,प्रमोद थोरात, सुनील थोरात ,अशोक थोरात, ज्ञानदेव थोरात ,गणपत थोरात, राहुल थोरात ,संदीप कदम, दत्ता धामणे, राजेंद्र गिरी, मयूर खरमाळे ,शिवाजी निगळ, दिलीप रायते ,अजय साळुंखे, योगेश थोरात ,आदित्य थोरात, मंगेश रोहम, राजेंद्र निगळ, सचिन थोरात ,दत्तू थोरात, रूपाली थोरात, ज्योती थोरातसह गावातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भाकीताची हवा काढली

आधुनिक केसरी

भाजप नेते गिरीश महाजन यांनी राज्यात आगामी काळात मोठे राजकीय भूकंप घडतील, असे भाकीत वर्तवले होते. काँग्रेसचे जळगावचे बडे नेते डॉ. उल्हास पाटील हे भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. पण त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याआधीच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उल्हास पाटील यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित केले आहे. याबाबत सुरु असलेल्या चर्चांवर बोलताना गिरीश महाजन यांनी तुम्हाला अपेक्षितही नसतील असे मोठे राजकीय भूकंप महाराष्ट्रभर होतील, असे मोठे वक्तव्य केले. त्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गिरीश महाजन यांच्या वक्तव्याची हवा काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी यावेळी भाजपवर सडकून टीका केली. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांची आज पुण्यात अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या शेकडो कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या नेत्यांनी संबोधित केले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. अतिशय चांगली आढावा बैठक आज झाली. यानंतर 6 विभागीय बैठका होणार आहेत आणि नंतर लोणावळा येथे शिबिर होईल. येणाऱ्या निवडणुकांमध्ये पक्ष निवडणूक लढणार की संघटनात्मक निवडणुका लढायच्या हे ठरवणं महत्वाचे आहे. बुथ कमिट्या निर्माण करणं गांभीर्याने घ्या, असे आदेश पृथ्वीराज चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणुका व्यक्तीकेंद्रित करू पहात आहेत, आणि त्याला काही प्रमाणात यशही येते. लोकसभा मतदारसंघ पाहिले तर निवडणुकीत भाजपच्या जागा वाढण्याची शक्यता नाही. उगाच हा इकडे जाणार, तो तिकडे जाणार अशा बातम्या पेरायचे काम सुरू आहे. त्यांच्यात निवडणुका घ्यायचं धाडस नाही, म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घेतल्या जात नाहीत. त्यांच्या छातीत धडकी भरली आहे, अशा शब्दांत पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपवर निशाणा साधला. नरेंद्र मोदी यांनी 2014ला निवडणूक आर्थिक विषयावर लढवली, अच्छे दिन आएंगे. 2019 ची निवडणूक राष्ट्रीय सुरक्षितेवरून लढवली. बालाकोट घटना. आता नवीन मुद्दा पाहिजे होता म्हणून कालचा राम मंदिरचा इव्हेंट. राम मंदिर हे मुळ जागेपासून 4 किमी लांब आहे. जुन्या मूर्ती कुठे आहेत? नवीन मुर्त्या कशा आल्या? मंदिर अर्धवट होते म्हणून शंकराचार्य यांनी विरोध केला. मग ज्योतिषाला विचारून उपवास केला, आज बहुतेक जेवले असतील, जमिनीवर झोपले, काही चुकीचे होऊ नये म्हणून. पण चुकीचे होणारच आहे, असा टोला पृथ्वीराज चव्हाण यांनी लगावला.

# कुलगुरु पुढील आव्हाने !



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**नुकत्याच तीन विद्यापीठाच्या कुलगुरू पदी नियुक्त्या झाल्या आहेत. आजकाल कुलगुरू समोर अनेक आव्हाने आहेत. त्यांना अनेक अडचणीचा सामना देखील करावा लागतोय. निवृत्ती पूर्वी नुकत्याच एका कुलगुरूंनी दिलेल्या मुलाखती वाचण्यात आल्या. त्यातही एका टी वी च्यानल ची (मधली ओळ) मुलाखत बऱ्याच गंभीर मुद्द्यांना स्पर्श करणारी आहे. कुलगुरू चे पद म्हणजे फक्त काटेरी मुकुटच नव्हे तर ती बाणाची काटेरी भीष्म शय्या देखील असते. आमच्या उस्मानिया विद्यापीठाचे एक माजी कुलगुरू म्हणत असत की कुलगुरू ना बी पी चा त्रास नसेल तर तो काम करीत नाही, टाईम पास करतो असे समजावे.**

बहुतेक प्रत्येक कुलगुरूंना त्याच्या कार्य काळात वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते.डॉ धनागरे यांनी या अनुभवावर आधारित जे पुस्तक ( हिरवे अनुबंध, मौज) लिहिले ते डोळे उघडणारे आहे.अगदी पहिल्या दिवसा पासून तर निवृत्तीच्या शेवटच्या दिवसा पर्यन्त त्यांना प्रचंड त्रास झाला. या ताणा पोटी त्याच्या पत्नीचा दुर्दैवी अंत देखील झाला!.. आमच्या वेळी नागपूरच्या कुलगुरूंना याच प्रकारच्या तापा पोटी मधूनच राजीनामा द्यावा लागला होता. डॉ राजन हर्षे यांचे नुकतेच प्रकाशित पक्षी उन्हाचा हे पुस्तक देखील कटू अनुभवाची जंत्रीच आहे! मी दिलेल्या राजीनाम्याची संख्या न सांगितलेली बरी! सुरुवातीला उल्लेख केलेल्या कुलगुरू चा अनुभव असाच आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. या सर्व प्रकरणाकडे आता गांभीर्याने बघायची वेळ आली आहे. हा त्रास विविध विद्यार्थी संघटना कडून होतो.कर्मचारी, प्राध्यापक संघटना कडून होतो.या सगळ्या संघटना, हे नेते कुठल्या ना कुठल्या राजकीय पक्षाशी संबंधित असतात. अनेक तरुण मुलांना या माध्यमातून आपल्या नेतेगिरीचे प्रदर्शन करण्याची हौस असते.अनेक चांगले नेते, लोक प्रतिनिधी, मंत्री अशा चळवळीतूनच पुढे आलेत, यशस्वी झाले हेही खरे. एक गोष्ट आधीच स्पष्ट केलेली बरी.. लोकशाही पद्धतीने योग्य, न्याय्य हक्कांसाठी लढा देणे यात काहीच गैर नाही. कुठल्याही व्यवस्थेत त्रुटी असतातच. निर्णय प्रक्रियेत माणसे असतातच. त्याच्या हातून चुका होणे,कुणी त्या मुद्दाम करणे, कुणी अप्रामाणिक असणे शक्य आहे.अशा वेळी प्रशासनाच्या लक्षात त्या चुका आणून देणे,कायद्याच्या चौकटीत राहून न्यायासाठी आग्रह धरणे योग्यच. कुणीही कुलगुरू सहसा हे अमान्य करणार नाही. शिवाय न्याय्य मागण्या रेटण्या साठी वेगवेगळी प्राधिकरण असतात,अधिकारी असतात. समित्या असतात.नाहीतर न्यायालयाचा देखील पर्याय असतोच शेवटचा! पण हे सारे न जुमानता,हम करे सो कायदा, बेकायदा मागण्या साठी आग्रह,गुणवत्ता, दर्जा याची तमा ने बाळगता बेकायदा सवलतीसाठी दुराग्रह हे खरे तापदायक असते.

उदाहरणच द्यायचे झाले तर नापास झालेल्या विद्यार्थ्याची पुढच्या वर्गात प्रमोशन ची नियमात न बसणारी मागणी.. ग्रेस गुण देऊन पास करण्याची मागणी.. सायन्स,इंजिनियरिंग सारख्या विषयात आवश्यक ती हजेरी नसतानाही परीक्षेला बसू देण्याची मागणी.. किंवा गुणवत्ता नसताना,नियमात बसत नसताना प्रमोशन चा अट्टाहास! इथे एकदा सवलत दिली की मग तेच उदाहरण वापरून पुनः पुनः नियमभंग करून आपली मागणी पुढे रेटण्याचाच नियम झालाय. हे प्रेशर फक्त संघटणाचेच नसते. तर वेग वेगळ्या प्राधिकरणा वर निवडून आलेल्या माननीय प्रतिनिधींचा देखील असतो. विद्यापीठातील प्राधिकरणा साठी होणाऱ्या या निवडणुका माझ्या माहिती प्रमाणे फक्त महाराष्ट्रातील विद्यापीठातच होतात.दक्षिणेकडे किंवा इतर विद्यापीठात ठरवून दिलेल्या नियम प्रमाणे कुलगुरू च नियुक्त्या करतात.त्याही कॅम्पस च्या नियमित प्राध्यापकाच्या. आपल्या विद्यापीठ कायद्यात २०१६ साली काही चांगले बदल झाले खरे.पण परिस्थिती फारशी बदलली नाही.माझे स्वतःचे पदभार स्विकारल्या नंतरचे नऊ महिने या निवडणूका घेण्यातच वय गेले.नॅक



सारखे महत्वाचे काम मागे पडले. लोकशाही पद्धतीला काहीच हरकत नाही. सर्वांना प्रतिनिधित्व मिळायलाच हवे. पण या निवडणुका देखील पक्षीय,राजकीय पातळीवरच लढल्या जातात. ज्याच्यावर आमदार खासदार लोक प्रतिनिधी चा वरदहस्त तेच निवडून येतात.काही सन्माननीय अपवाद सोडले तर इथेही गुणवत्तेशी भरपूर तडजोड केली जाते.रिझल्ट आलेत की या विद्यापीठावर या पक्षाचा, संघटनेचा झेंडा अशाच बातम्या प्रसिध्द होतात.निवडणुका दरम्यान ही सुशिक्षित प्राध्यापक मंडळी




एकमेकाशी ज्या पद्धतीने भांडतात, ते कधी कधी किळसवाणे असते.चक्क राजकारणाची धुळवड सुरू असते या काळात.. दक्षिणेकडे विद्यापीठात अशा निवडणुका नसूनही कारभार तुलनेत अधिक चांगला चालतो. गैर प्रकार होतच नाहीत असे नाही. पण प्रमाण त्या मानाने कमी..या निवडून आलेल्या प्रतिनिधींचे स्तोम इतके की प्रत्येक जण आपली ओळख सिनेट मेंबर, अक्याडेमिक कौन्सिल मेंबर, एम सी मेंबर अशीच करतो.कुणालाही मी प्राध्यापक आहे,माझे अमुक स्पेशलायझेशन आहे,मी अमुक विषय शिकवतो, माझे या क्षेत्रात मूलभूत संशोधन आहे..हे अभिमानाने सांगावेसे वाटत नाही. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी प्रशासना वर अंकुश ठेवण्यात, विद्यार्थी, प्राध्यापक यांचे न्याय्य प्रश्न कायदेशीर मार्गाने पुढे रेटण्यात गैर काहीच नाही. पण या प्राधिकरणाच्या मिटिंग मध्ये जो गोंधळ होतो कधी कधी तो तापदायक असतो. कारण छुपा अजेंडा सृजनात्मक नसतो. जाती पाती चे राजकारण करणारा विघातक अजेंडा असतो.( काही अपवाद सोडता) इथेही कुलगुरूंना धारेवर धरण्याची प्रथा पाळली जाते. शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे,विद्यार्थी हिताचे निर्णय घेणे, नवे उपक्रम राबविणे, नवीन विज्ञान तंत्रज्ञानाची अम्मल बजावणी करणे,उत्तम संशोधनाला प्रोत्साहन देणे, उत्तम मानांकनासाठी, भविष्यातील आव्हाना साठी प्रयत्न करणे, हे सारे राहते बाजूला. कुलगुरूंना अडचणीत कसे आणता येईल, प्रशासनात अडथळे कसे निर्माण होतील, स्वतःचा, राजकारणी पक्षाचा, संघटनेचा अजेंडा कसा पुढे रेटता येईल असाच प्रयत्न असतो. याचा अर्थ सगळं दोष संघटनांचा,अन् कुलगुरू मात्र निर्दोष, योग्य असे मुळीच म्हणायचे नाही. काही कुलगुरू देखील चुकीच्या मार्गाचा अवलंब करतात. आर्थिक अफरातफर करतात.अगदी लाच घेतल्याची उदाहरणे देखील स्टिंग ऑपरेशन करून माध्यमांनी उघड केली आहेत. खरे तर कुलगुरू यांचे काम स्वतःच आदर्श घालून दाखवण्याचे..पण प्रत्येक क्षेत्रात अपवाद असतातच. तरीही एखाद दुसरा अपवाद वगळल्यास कुणा कुलगुरूंना कठोर शिक्षा झालीय, कुणाचा पगार, पेन्शन रोखल्या गेलीय असे ऐकिवात नाही. करून सावरून ही भ्रष्ट मंडळी उजळ माथ्याने समाजात वावरताना दिसतात. यापैकी ज्याचे सरकार दरबारी संबंध आहेत,ते तर सही सलामत सुटून दुसऱ्या मोठ्या पदावर विराजमान झालेले दिसतात. खरे तर विद्यापीठ संघटनांनी निर्दोष, प्रामाणिक व्यक्तीला त्रास देण्या ऐवजी अशा भ्रष्ट मंडळींना शिक्षा होईल, यासाठी संघर्ष करायला हवा. त्यामुळे शिक्षण क्षेत्र काही प्रमाणात का होईना, स्वच्छ होईल! असे म्हणतात की तुम्हाला एखादा देश बरबाद करायचा असेल तर युद्ध, शस्त्र याची गरज नाही.तुम्ही तिथली शिक्षण व्यवस्था खीळखीळी केली तरी पुरे! आपली प्रगती, विकास, नैतिकता, संस्कार, चारित्र्य सारे सारे शिक्षण प्रणालीच्या मजबूत पायावर अवलंबुन असते. त्यासाठी विद्यापीठाचा एकटा कुलगुरू जबाबदार नसतो. विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, किंबुहूना अख्खा समाज देखील यासाठी जबाबदार असतो. त्यामुळे शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांनी एकत्र पण केला पाहिजे नव वर्षात..शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ,जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी, सशक्त,चारित्र्य संपन्न नवी पिढी घडविण्यासाठी हे अत्यंत गरजेचे आहे. सहविर्यम कर्वावहै.. LET US DO GREAT THINGS TOGETHER!

# राम मंदिर प्राणप्रतिष्ठा आणि जळफळाट



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**आपली मुल शिकली पाहिजेत घडली पाहिजेत हे प्रत्येक पालकाच स्वप्न असतं. पण हे स्वप्न पूर्णत्वास जात असताना मुलांवर अपेक्षेचा बोजा पडु नये.म्हणून अपेक्षा आणि वास्तव याचा योग्य ताळमेळ पालकांना घालता आला पाहिजे.वेळ बदलली त्या सोबत काळ आणि परस्थिती देखिल बदलली आहे.कुटुंब, समाज ,शाळा, महाविद्यालय,कॉलेज,या मध्ये आजपासून पंचवीस तीस वर्षे पुर्व असणारी शिस्त आज पुर्णपणे लोप पावत चालली आहे.हे वास्तव नाकारता येणार नाही.मुलांच्या मध्ये प्रचंड , चंगळवाद,आळस, मान अपमान सहन न होण्याची वृत्ती.वाढली आहे तर गैरशिस्तीने थैमान घातलं आहे. हाताबाहेर जाणारी मुलं हि सध्याच्या काळातील पालकांची सगळ्यात मोठी डोकेदुखी ठरत आहे.**

एकीकडे अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होताच संपूर्ण देश व विदेशात जल्लोष साजरा करण्यात आला. अनेक मंदिरांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले, अनेक ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या. देशात एक आनंदाचे वातावरण तयार झालेले पाहायला मिळाले. मात्र आपल्या शेजारी राष्ट्राला ही बाब रुचलेली नाही. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या काही तासांनंतर पाकिस्तानने या सोहळ्याचा निषेध केला आहे. एवढेच नव्हे तर चीन व चीनच्या सैनिकांनी जय श्री राम चा जयघोष केला तर पाकिस्तानची जळफळाट झाली. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून एक्सवर प्रसिद्धी पत्रक शेअर करण्यात आले आहे. भारतामधील अयोध्या शहरातील बाबरी मशीद पाडून त्याठिकाणी बांधण्यात आलेल्या राम मंदिराचा आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा पाकिस्तान निषेध करतो, असे या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. अयोध्येत मशिदीच्या जागेवर मंदिर बांधल्यामुळे भारताच्या लोकशाही चेहऱ्याला एक काळा डाग लागला आहे. विशेष म्हणजे, यानंतर आता वाराणसीतील ज्ञानवापी मशीद आणि मुथरेतील शाही ईदगाह मशिदीचाही आता नंबर लागणार असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे ही यादी वाढतच जात आहे. या मशिदींनाही विनाशाचा सामना करावा लागलणार आहे, असेही या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. गेल्या ३१ वर्षांतील घडामोडी आणि आजच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याकडे पाहिले तर भारतातील वाढत्या बहुसंख्यांकवादाचे हे सूचक उदाहरण दिसत आहे. यातून भारतातील मुस्लिमांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात उपेक्षित ठेवण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे,असे या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. पाकिस्तानने या पत्रकाच्या माध्यमातून भारतातील मुस्लीम समुदाय आणि अल्पसंख्याकांच्या प्रार्थना स्थळांना सुरक्षा पुरविण्याचे आवाहन केले आहे. पाकिस्तानकडून भारताला उपदेश देण्यात येत असले तरी मानव अधिकार संस्थांच्या मतानुसार, उलट पाकिस्तानमध्ये हिंदू, ख्रिश्चन आणि अहमदी यासारख्या धार्मिक अल्पसंख्याकांना सतत भेदभावाचा सामना करावा लागतो. सामाजिक बहिष्कार, मर्यादित संधी आणि हिंसाचार अशा अत्याचाराचा त्यात समावेश आहे. दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर म्हटले की, "राम आग नाही ऊर्जा आहे. राम विवाद नाही समाधान आहे. राम वर्तमान नाही अनंतकाल आहे. राम भारताचा आधारही आहे आणि विचारही आहे." ते पुढे म्हणाले, "‘"एक काळ असा होता की लोक म्हणायचे की राम मंदिर तयार झालं तर आग लागेल. असे लोक भारताच्या सामाजिक भावनेच्या पवित्रतेला ओळखत नाहीत. श्रीरामाच्या मंदिराचे बांधकाम हे भारतीय समाजाच्या शांतता, संयम, परस्पर सौहार्द आणि समन्वयाचे प्रतीक आहे. या बांधकामामुळे आगीला नाही तर ऊर्जेला जन्म देत आहे. हे मंदिर केवळ देवाचे मंदिर नसून ते भारताच्या दृष्टीचे, भारताच्या तत्त्वज्ञानाचे, भारताचे मार्गदर्शक आणि रामाच्या रूपातील राष्ट्रीय चेतनेचे मंदिर आहे. ऑल इंडिया इमामर संघटनेचे मुख्य इमाम उमर अहमद इलियासी यांनी आजच्या राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला हजेरी लावली होती. त्यांनी मंदिर निर्माणाचे स्वागत केले. "आज जे घडलं ते बदलत्या भारताचं चित्र आहे. आजचा भारत हा उत्तम भारत आहे. माझ्या बरोबर हे स्वामी उभे आहेत. याचंच नाव भारत आहे. मी इथे प्रेमाचा संदेश घेऊन आलो आहे. आमच्या पूजा पद्धती नक्कीच वेगळ्या असू शकतात, धार्मिक धारणा वेगळ्या असू शकतात, आस्था वेगळ्या असू शकतात. मात्र आमचा सर्वात मोठा धर्म माणुसकीचा आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीरामाच्या जयघोषाने दुमदुमली बोरीनगरी !

## सर्व मंदिरे सुशोभित... दीपोत्सव... रांगोळीने रस्ते सजले

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** अयोध्या येथील श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठेनिमित्त बोरी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता.गावातील महिला, मुले, मुली, जेष्ठ नागरिक या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, श्रीरामाच्या जयघोषाने अवघी बोरीनगरी दुमदुमली होती. त्यामुळे जणू काही बोरीत अयोध्या नगरीच अवतरली... असे वातावरण निर्माण झाले होते. येथील शिवगीर बाबा मठामध्ये शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते.

राम मूर्तीची प्रतिष्ठानानिमित्त शहरामध्ये घरोघरी गुढी उभारण्यात आली होती तर दारासमोर भव्य रांगोळी काढण्यात आल्या होत्या. सोमवारी (दि.२२) सकाळी ८ वाजता बोरी येथे श्रीराम मंदिरापासून भव्य रामलल्लाच्या प्रतिमेची व पालखीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये ढोल-ताशा, टाळ-मृदंग, गोंधळी बँड पथक, कलशधारी महिला, सहाशे भगव्या टोप्या घातलेले तरुण, महिला मंडळी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी ग्रामस्थ, व्यापारी सहभाग झाले होते. ही मिरवणूक राम मंदिर शिवगिरी बाबा मठ ,ग्रामपंचायत चौक, सोमानी कॉलनी, कौसडी फाटा, पाण्याची टाकी, बसस्थानक, मेन रोड, पेठ गल्ली, दक्षिणमुखी हनुमान मंदिर मार्गे राममंदिरामध्ये आल्यानंतर मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले.त्यानंतर महाआरती करण्यात आली.



दक्षिणमुखी हनुमान मंदिरामध्ये सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मधुकर महाराज खापरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. नंतर महाप्रसाद कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घेतला. तर शिवगीर बाबा मठामध्ये बाल व्यास राहुल महाराज राजूरकर यांच्या मधुरवाणीतून शिवपुराण कथेचे निरूपण करण्यात आले. नंतर महाप्रसादाचे लाभ भाविकांनी घेतला. हे सर्व कार्यक्रमाचे नियोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते. बोरी परिसरातील विविध मंदिरामध्ये ग्रामस्थांनी या राम मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठाचे औचित्य साधून अनेक ठिकाणी भव्य दिव्य कार्यक्रम घेण्यात आले. तसेच सायंकाळी सात वाजता रामेश्वर सोमेश्वर मंदिरात ५ हजार दिव्यांची उजळण करून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

# एटीएम फोडण्याचा प्रयत्न फसला

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील बसस्थानक लगत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियातील एटिएम फोडण्याचा प्रयत्न बुधवारी (ता.२४) पहाटे दोन वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी केला पण सायरण वाजताच चोरटे पसार झाले आहेत.पोलीसानी अज्ञात चोरट्यां विरुद्ध गून्हा दाखल केला आहे. पोलीसानी दिलेल्या माहितीनुसार, येथील स्टेट बँक ऑफ इंडिया कार्यालय प्रारंभी आंबेडकर चौकात जून्या ईमारतीत कार्यरत होते.आता बसस्थानका लगत उभारण्यात नव्या ईमारतीत स्थलांतर करण्यात आले आहे.त्या परिसरात दाटवस्ती नसल्याने त्या संधीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी गूरूवारी पहाटे दोन वाजताच्या सुमारास एटिएम फोडण्यासाठी गॅस व कटरचा वापर केला पण दरम्यान सायरन वाजताच चोरट्याचा प्रयत्न फसला आणि ते पसार झाले. घटनास्थळी पोलिस निरीक्षक सुभाषचंद्र मरकड यांनी भेट देऊन पाहणी केली.श्वान पथकास पाचारण करण्यात आले पण काहिच हाती लागले नाही. पोलीसानी चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# तूरडाळीची उसळी, दर २०० रुपयांवर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** खरीप हंगामात तुरीसह अन्य कडधान्यांच्या लागवडीत झालेली घट आणि कडधान्यांच्या काढणीच्या वेळी बसलेला अवकाळीचा फटका, यामुळे देशात तूर आणि मुगाच्या उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. तसेच आयात केलेली तूर ग्राहकांच्या पसंतीस उतरत नसल्यामुळे किरकोळ बाजारात तूरडाळीचे दर १६० ते २०० रुपयांवर गेले आहेत. खरीप हंगामातील तूर बाजारात येऊ लागली आहे. तुरीला २०२४ साठी केंद्र सरकारने सात हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला आहे. पण नव्या तुरीची आवक होताच बाजारातील दर सरासरी नऊ ते १० हजार रुपये प्रति क्विंटलवर गेले आहेत. काढणीच्या वेळी तूर पावसात भिजल्यामुळे दर्जा घसरला आहे. खरेदी केलेली तूरडाळ मिल्समध्ये प्रक्रियेसाठी नेल्यानंतर उताऱ्यात घट दिसून येत आहे. एक क्विंटल तूरीपासून जेमतेम ६० ते ७० किलो तूरडाळ तयार होत आहे, तीही अपेक्षित दर्जाची नसते. तुरडाळीचे दर सरासरी १६० ते २०० रुपयांपर्यंत गेले आहेत, अशी माहिती कडधान्यांचे व्यापारी नितीन नहार यांनी दिली.



# धुळे जिल्ह्यातील बाळासाहेब भदाणे यांच्यासह अनेक कार्यकर्तेही भाजपामध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जळगावचे माजी खासदार काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, डॉ.केतकी पाटील, धुळे जिल्ह्यातील बाळासाहेब भदाणे यांच्यासह काँग्रेस, उबाठा गटातील अनेक सरपंच, कार्यकर्त्यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन, खा. डॉ. सुभाष भामरे, आ. जयकुमार रावल, आ. मंगेश चव्हाण, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विक्रांत पाटील, जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष उज्वला बेंडाळे, रावेर ग्रामीण अध्यक्ष अमोल जावळे आदी यावेळी उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेल्या नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या विकास कामांचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावले जातील, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी जाहीर केले. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी यावेळी सांगितले की, मोदी सरकारने भारताचे नाव जगात उंचावले आहे. भारताला क्रमांक एकचा देश बनविण्याचा संकल्प केला आहे. अशा नेत्यांच्या हाताखाली काम करायला मिळणे हे सर्व कार्यकर्त्यांचे भाग्य आहे. राज्यातील महायुतीचे सरकारही राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळेचडॉ. उल्हास पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ, जाणत्या काँग्रेस नेत्याने भारतीय जनता पार्टीच्या प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी डॉ . उल्हास पाटील यांच्या शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. डॉ.पाटील यांच्या प्रवेशामुळे भारतीय जनता पार्टी आणखी बळकट होईल आणि उत्तर महाराष्ट्रात यापुढील काळात आणखी पक्ष प्रवेश होतील, असेही महाजन यांनी नमूद केले. डॉ. केतकी पाटील यांची भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केल्याचे बावनकुळे यांनी जाहीर केले. डॉ. वर्षा पाटील, देवेंद्रभैय्या मराठे, संदेश पाटील, पुंजाजी पाटील, सुरेंद्र कोल्हे, राजू राणे आदींसह काँग्रेसच्या शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश केला. धुळे जिल्ह्यातील 67 सरपंचांनी बाळासाहेब भदाणे यांच्या नेतृत्वाखाली भाजपामध्ये प्रवेश केला.

# मुख्यमंत्री शिंदे यांनी केले शिवाचार्य सिध्दचैतन्य महाराज यांचे अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** दि. 22 जानेवारी रोजी अयोध्या येथे श्रीराम यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा दिमागदार सोहळा पार पडला. या सोहळ्याकरता अयोध्या ट्रस्ट यांच्याकडून मोजक्याच लोकांना निमंत्रण पाठवण्यात आले होते यामध्ये जगद्गुरु श्री पलसिद्ध धर्मपीठ साखरखेर्डाचे मठाधीपती, श्री सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनाही विदर्भातून एकमेव निमंत्रित करण्यात आले होते. अयोध्या येथे श्रीराम यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला दिग्गज लोकांची उपस्थिती होती यामध्ये विविध पीठांचे साधुसंत महंत यांना सुद्धा आमंत्रित करण्यात आले होते, त्यामध्ये साखरखेर्डा येथील सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज यांना सुद्धा आमंत्रित केल्या गेले होते त्यामुळे सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज हे सुद्धा 22 जानेवारीला झालेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित होते. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा श्री सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांना पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले आहे. याच पार्श्वभूमीवर साखरखेर्डा येथे 25 जानेवारी ला सद्गुरु सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज यांचे साखरखेर्डा येथे आगमन होणार असून गावकऱ्यांच्या वतीने त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे,यामध्ये बँड सांस्कृतिक वाद्य भजन दिंडी लेझीम पथक आधी असणार आहे,सदर मिरवणूक भोगावती नदी काठापासून माळीपुरा धनगर पुरा गणपती चौक गुजरी चौक दगडी मज्जिद ते पलसिद्ध मठामध्ये विसर्जित होईल, त्यामुळे सर्वांनी मिरवणूकी करता उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुंडलिकराव गव्हाणे यांचे दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील शेलुखडसे नजिक असलेल्या



पाचंबा येथील शेतीनिष्ठ शेतकरी कुंडलिक दगडूजी गव्हाणे यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. नागपुर येथे कॉटन सिलेक्टर म्हणून एका नामांकित कंपनीत कार्यरत असलेले सुरज पाटील गव्हाणे यांचे वडील कुंडलिक गव्हाणे ( भजनी बापू ) हे हाडाचे शेतकरी होते. त्यांच्या सहचारिणी श्रीमती गुंफाबाई कुंडलिक गव्हाणे यांनी त्यांची अखेरच्या श्वासापर्यंत सुश्रुषा केली आहे. सात मुली आणि एक मुलगा सून जावई व ईतर नातेवाईकांचा खुप मोठा आप्त परिवार असलेले कुंडलीक गव्हाणे हे शेतीनिष्ठ शेतकरी म्हणून पंचक्रोशीत ओळखीचे होते. स्वतः अशिक्षित असून देखील त्यांना शिक्षणाची खुप जाण होती. म्हणूनच त्यांनी एकुलता एक असलेला मुलगा सुरज गव्हाणे यांना लहानपणा पासूनच औरंगाबाद सारख्या मोठ्या शहरात शिक्षणासाठी ठेवले होते. त्याचेच फलित म्हणून आज सुरज पाटील गव्हाणे हे उच्च शिक्षण घेऊन नागपुर येथे एका मोठ्या कंपनीत कार्यरत आहेत. कुंडलिक गव्हाणे यांचा मनमिळावू स्वभाव, सर्वांना आपलेसे करून घेण्याची वृत्ती, आणि सर्वांच्या सुख दुःखात तन मन धनाने सामील होण्याचा त्यांचा स्वभाव असल्याने त्यांच्या विषयी समाजात विशेष आदर आहे. वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांच्या गावावर व नातेवाईक परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली, जावई, नातवंड असा खुप मोठा आप्त परिवार आहे.

# धर्माबाद येथे मोफत आरोग्य शिबीर व पत्रकारांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** शहरात काल मंगळवार 23 जानेवारी 2024 रोजी, आर्य भवन येथे हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या 98 व्या जयंती निमित्त शिवसेना पक्षातर्फे (उद्धव ठाकरे गट) सकाळी 11 वाजता मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते तसेच तालुक्यातील व शहरातील सर्व पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. इकडे मोफत आरोग्य शिबिरासाठी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या चमूने येथे काम पाहिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.कमल किशोर काकाणी हे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिवसैनिक गणपतराव कात्रे, ज्येष्ठ पत्रकार जी.पी.मिसाळे, डॉ.वेणुगोपाल पंडित, नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष सखाराम निलावार, बहुजन आघाडीचे



सल्लागार जे.के. जोंधळे, माजी नगरसेवक अंकुश भोसले व सुधाकर जाधव, डॉ.प्रवीण कांबळे आणि शिवराज पा. गाडीवान उपस्थित होते. येथे डॉ.काकाणी, सखाराम निलावार तथा शिवराज पा. गाडीवान यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना विधानसभा संघटक शिवराज पा.मोकळीकर, जिल्हा उपाध्यक्ष गणेश गिरी, शहराध्यक्ष बनसोडे, प. स. चे माजी सभापती मारोती पा. कागेरू आणि माजी तालुका अध्यक्ष अध्यक्ष रामचंद्र रेड्डी यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी परिश्रम घेतले. ह्या कार्यक्रमासाठी पत्रकार चंद्रभीम हौजेकर यांनी सूत्र संचालन केले. आरोग्य शिबिरात डॉ.शिवप्रेमा परबते यांच्या मार्गदर्शनाखाली येथील ग्रामीण रुग्णालयाच्या चमूने उत्कृष्टरित्या काम पाहिले. कार्यक्रमानंतर आयोजकांतर्फे सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

# गोष्ट एका गावाची




सागरकुमार झनके
संपर्क क्र. 9822575244

आधुनिक केसरी

**सुर्य उतरंडीला लागला होता. गावभर पिवळी छटा पसरुन सुर्याने गावाला आपल्या मिठीत घेतलं होतं. रानातून गायी वासरे गावात येत होती. कामाचे दिवस असल्याने प्रत्येकजन शेताच्या कामात दंग होता. काही वेळातच गाव काळोखाच्या गर्दित विलीन होणार होतं. गावातील कुत्रे अधुन - मधुन ओरडत होते .गावात कमालीची शांतता पसरली होती.लवकरच गाव झोपी जाणार होतं.जो तो शेतात काम करुन दमला होता. अचानक आकाशात काळे ढग जमा होऊ लागले. तोवर गाव पुर्णतः निद्रिस्त झालं होतं. पावसाला सुरवात झाली होती.तो हळूहळू बरसत होता.गावाच्या खालून एक छोटीशी नदी होती. तीचा उगम सातपुड्याच्या कुशीतून झाला होता. ऐरव्ही उन्हाळ्यात कोरडी राहणारी नदी पावसाळ्यात मात्र झुळझुळ वाहत राहायची.गावात कमालीची स्मशानशांतता पसरली होती.**

पावसाच्या सरी अधूनमधून कोसळत होत्या.रात्र हळूहळू पुढे सरकत होती.मध्यरात्रीचा प्रहर टळून गेला होता.आता पावसाच्या धारानाही जोर चढला होता.गावापासून दहा पंधरा अंतरावर असलेला सातपुडा डोंगर मात्र जागीच होता.आज त्याचीच सत्वपरीक्षा होती.डोंगराच आणि पावसाचं जोरदार मिलन होनार होतं.मेघराज्या धाय मोकलून बरसत होता.जनू पृथ्वीतलावावरील सर्व ढग सातपुड्याच्या कुशीत जमा झाले होते.तो बिचारा सर्व सहन करत होता.ढगांना अलींगन देत त्यांच्यात एकरूप होत होता.त्याचा नाईलाज होता.दरी, खोरे,उतरंडीने तो बराच व्यापला होता.त्यामुळे पावसाचं पाणी ज्यास्त वेळ थांबून ठेवू शकत नव्हता.तो हवालदिल झाला होता.विदुलत्तेच्या समोर तो नतमस्तक झाला होता. विदुलत्तेच्या किंचाळ्यांनी तो पुरता घायल झाला होता.सारे ढग एकत्र आले होते.त्यांनी ठरवलं होतं. आज आपल्याला या सातपुड्याच्या डोंगरात मोकळं होऊनच परत जायचं आहे.त्यांनी आपल्या सिमा तोडल्या.ढगांना भेगा पडायला सुरुवात झाली. थेंबाथेंबानी सांडणारा पाउस आता मोठमोठ्या धारांनी बरसत होता.त्याचा आज इरादाच वेगळा होता.विजा आणि पाणी एकत्र येवून मोठमोठ्यांनी बरसत होते.विजांच जोरजोराने कडाडन आणि पावसाचं जोरदार बरसनं;यात डोंगरांची जणू धुमधडाक्यात आंघोळ चालू होती.हा सारा खेळ दिवस उजाडता उजाडता सुरू झाला होता. डोगरातील छोटी मोठी नदी नाले मोठ्या ताकदीने वाहू लागले.गेल्या कित्येक वर्षांनी त्यांना असा काठोकाठ वाहण्याचा योग आला होता.त्यामुळे ते बेभान होऊन वाट मिळेल तिकडे वाहत होते. त्यांच्या मर्यादेपेक्षा पाणी त्यांच्या पात्रात जमा होत होते.त्याला गती मात्र कमालीची होती.मोठमोठे दगडही ते सहज वाहून नेत होते.लहान-मोठी झाडे पाण्याच्या प्रवाहात वाहून जात होती.एका क्षणात सातपुड्याच्या डोंगराच चित्र बदललं.

डोंगरातून वाहणाऱ्या नद्या आता वाट मिळेल तिकडे धावत होत्या.आता त्यांना बंदीस्त करता येत नव्हतं.आपल पात्र सोडून त्या सैरावैरा धावत होत्या.आता मात्र त्यांचा संबंध गावाशी येणार होता. रात्र संपुन आता उजेडाची चाहूल लागली होती. गाव हळू जागी होत होतं.जो तो आप आपल्या कामात व्यस्त होता.पाऊस आपला हळूहळू आहे त्या स्थितीत हळूहळू बरसत होता.इकडे गावालगत वाहणारी नदी गावाला मिठीत घ्यायला अधिर झाली होती.ती बेधुंद होत होती.पाण्याचा मोठा प्रवाह तीच्या सोबत होता.डोंगरातून खाली उतरल्यावर कुणाच्या शेतातून,कुणाच्या बंधाऱ्यातून जशी वाट मिळेल तसं तीच पाणी जात होतं.तीला आलेला तो पुर नव्हता.तो महापूर होता. महापूर एवढा की काही क्षणात त्यानं होत्याच नव्हतं केलं. दिवस उजाडला होता.पाण्याची रिपरिप चालूच होती. गावच्या नीदिला पुर आला होता.गावातील जो तो आपापल्या कामात दंग होता.कुणाच्याही ध्यानीमनी नव्हतं की,नदीचं पाणी एकाएकी गावाला विळखा देईल.पुराचा प्रवाह जोराचा होता.नदिच पाणी ताकदीने वाढत होतं.पाहता पाहता पाणी गावात शिरायला लागलं.नदिलगत असलेल्या गावांतील शाळेचं आवारही पाण्यानं तुडुंब भरलं.लोकांची अस्वस्थता वाढली.पुराच पाणी वेगानं वाढत होतं. लोकांच्या लक्षात आलं.अंगणातलं पुराचं पाणी केव्हाही घरात शिरणार होतं.लोकांची धावपळ वाढली.जीव मुठीत धरून जो तो पळत होता. संपुर्ण गावात पाणी शिरलं होत.कुणाच्या दारात तर कुणाच्या घरात पाणी वाट मिळेल तिकडे जात होतं.घरातील मोठी माणसं लहान मुलं आणि वयोवृद्धांना अंगाखांद्यावर घेवून गावाच्या बाहेरील उंच भागावर असलेल्या मारुतीच्या मंदिराकडे धाव घेत होते.गावाबाहेर असलेलं मारोतीच मंदिर



जुनं होतं.चार पाच एकराच्या परिसरात हे मंदीर विस्तीर्ण जागेवर पसरलं होतं.मंदिराबाहेर मोठमोठे दिनाचे शेड उभारले होते.लोक त्यात आसरा घेत होते.गोठ्यात बांधलेले गुरेढोरे मोठमोठ्याने ओरडत होती.त्यांचा आक्रोश भयानक होता.त्यांना वाचवण्यासाठी घरमालक जीवाची पर्वा करत नव्हता.बरिच जनावरे वाचवल्या जात होती.पण पुराचं पाणी वेगानं वाढत असल्याने गुराढोराच्या नाका तोंडात पाणी जात होतं.काहींना वाचवनं कठीण जात होतं.पण तरिही घर मालक त्या पुराच्या पाण्यात जाऊन आपल्या गाय,वासरु,बैल,म्हैस ज्या जनावरांच्या नाकातोंडात पाणी जायला लागले त्यांना वाचवण्यासाठी धडपडत होता.पण आता परिस्थिती हाताबाहेर जातांना दिसत होती. डोळ्याच्या समोर त्याची उरली सुरली गुरू ढोर वाहून जात होती.ज्यां जनावरांना जीवापाड जपलं आज ते डोळ्यांदेखत शेवटचा श्वास घेत होते. ज्या जनावराचा दोर सुटला नाही त्या जनावरांच्या नाकातोंडात पाणी शिरल्याने जागीच उतानं होऊन आपला जीव सोडत होतं.सारच फार भयंकर होतं. कोणाची,म्हैस कोणाची गाय,कोणाच्या बकऱ्या तर कुणाची बैलजोडी पुराने वाहून जात होती नाही तर जागीच आपला जीव देत होती.ईकडे गावात लोकांची घरच्या घर पुरात वाहून जात होती. परिस्थिती लोकांच्या लक्षात आल्याने कशाचाही विचार न करता फक्त जीव वाचवण्यासाठी धडपडत होते.दिवस असल्यामुळे जीव वाचवणं गावलोकांना शक्य होतं होतं.जर हिच घटणा रात्रीला घडली असती तर आपण कल्पनाही करू शकलो नसतो.एवढ्या मोठ्या प्रचंड प्रमाणात जीवितहानी झाली असती. म्हणतात ना काळ आला होता पण वेळ आली नव्हती.लोक हवालदिल होऊन बघत होते.पुराच्या पाण्यानं संपूर्ण गाव कुशीत घेतलं होतं. कुणाचं घर कोठे आहे.एकमेकांना ओळखायला येत नव्हते.महापुराच हे भयानक स्वरूप लोक प्रथमच अनुभवत होते.गावातील बुजुर्ग लोक सांगत होते. अस महापूर आम्ही आमच्या आयुष्यात कधीही पाहिला नाही.घरांची अक्षरशः राखरांगोळी झाली. घरातील सर्व सामान वाहून जात होतं.बाया माणसं लेकरं धाय मोकलून रडत होती.प्रत्येकाच काळीज फाटलं होतं.अंतःकरणातून वेदनेच्या धारा वाहत होत्या. महासंकटाच्या या महापुरात प्रत्येकाच स्वप्न वाहून जात होतं. नियतीच्या समोर सारा गाव शरण गेला होता. हळूहळू पुराचं पाणी कमी होत होतं.कुणाच्या घराच्या पडक्या भिंती तर कुणाच घर कोठे होते ओळखायलाही येत नव्हते.पुराने प्रंचड नुकसान केलं होतं.अगदी न भरूण येणार.जो तो केविलवाण्या नजरेने गावाकड नजर टाकत होता. आता ते गावच राहिलं नव्हतं.गावाच प्रचंड नुकसान झाले होते.गावात सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले होते.घरदार रस्ते सार वाहून गेलं होतं.शेतीची तर परिस्थिती भयानक होती.पुर आता पुर्णतः ओसरला होता.अगदी तीनचार तासात गाव उध्वस्त झालं होतं.लोक फक्त पाहत होते.प्रत्येकाच्या डोळ्यातून दुःखाचे अश्रू सांडत होते.महापूर ओसरल्यानंतर आता वेदनेच्या महापुराला भरती आली होती. प्रत्येकाच मन घायाळ झालं होतं.पोटात भुकेचा वनवा पेटला होता.पण दुःख येवढं मोठं होतं की, त्यापुढे सुखाचा सर्वात मोठा क्षणही फिका वाटत होता.

# खांबेगाव जलजीवन योजनेचे काम थातुरमातुर; तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील जलजीवन योजनेचे काम अर्धवट अवस्थेत असल्याच्या अनेक तक्रारी असतानाच खांबेगाव व सुनेगाव तलावातून ज्या जलजीवन योजना सुरू आहेत त्याकामाची क्वालिटी फारशी समाधानकारक नाही असा वारंवार तक्रारी होत असतात. खांबेगाव (ता. लोहा) येथील पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाईपलाईन व टाकीचे काम बोगस होत आहे त्याची चौकशी करावी या मागणीसाठी गावातील प्रमुख कार्यकर्ते तुळशीराम लुंगारे यांनी तहसील कार्यालया समोर २४ तारखे पासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा जि प नांदेड गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात ग्रामस्थ व तुळशीराम लुंगारे यांनी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले आहे
खांबेगाव येथील जलजीवन योजने अंतर्गत होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेत पाईपलाईन व टाकीचे काम बोगस होत आहे आडगाव तलावावरून पाईप लाईन गावापर्यंत इस्टीमेट प्रमाणे होत नाही तसेच जुन्या विहिरीवर घराचे बांधकाम बोगस केले आहे असा अनेक तक्रारीची चौकशी करावी यासाठी तुळशीराम लुंगारे व ग्रामस्थ यांनी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या संदर्भात पाणीपुरवठा उपअभियंता याच्याशी संपर्क केला असता त्याचा संपर्क झाला नाही त्यामुळे प्रतिक्रिया कळू शकली नाही. खांबेगाव सारखीच तालुक्यातील अनेक गावांत जलजीवन योजनेच्या कामांची अवस्था आहे.



# ४ फेब्रुवारी रोजी चिखली येथे सकल मराठा वधू - वर परिचय मेळावा !

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सकल मराठा सद्भावना ट्रस्टच्या वतीने चिखली येथे दि . ४ फेब्रुवारी रविवार रोजी सकल मराठा वधू - वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, सदर मेळाव्याचे आयोजन श्री शिवाजी विद्यालय हॉल येथे करण्यात आले असून,सकल मराठा समाजातील इच्छुक उपवर वधू -वरं परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी मराठा समाजातील इच्छुक तरुण तरुणीचा परिचय सर्वांना व्हावा,तसेच लग्न संबंध जुळवण्यासाठी सोयीचे व्हावे म्हणून सदर वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून मराठा वधू - वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन आमदार श्वेताताई महाले पाटील करणार असून,कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी आमदार धुरपतराव साळवे असणार आहेत,तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार रेखाताई खेडेकर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्राध्यापक नरुभाऊ खेडेकर, सुनील जवंजाळ सामाजिक कार्यकर्ते हे असणार आहे,तरी तरुण-तरुणीसह पालकांनी सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा सद्भावना ट्रस्ट वतीने करण्यात आले आहे.

# कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या लढाई करता सज्ज व्हा : रविकांत तुपकर

## बावनबीर व सोनाळा येथे एल्गार परिवर्तन मेळावा !

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** रविकांतभाऊ तुपकर यांच्या संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर व सोनाळा येथील 'एल्गार परिवर्तन मेळाव्यां'ना (ता.२१ जाने) गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अतिशय उत्साहात फटाक्यांची अतिषबाजी करत गावकऱ्यांनी रविकांत तुपकर यांचे स्वागत केले. तर काकनवाडा बु. येथे ढोल-ताशाच्या गजरात मिरवणूक काढून गावकऱ्यांनी स्वागत केले.
दरम्यान बावनबीर येथे झालेल्या मेळाव्यात श्री.मधुकरकाका आढाव यांनी रविकांतभाऊ तुपकर यांना लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी लागणाऱ्या खर्चात लोकसहभाग म्हणून रु. ५१ हजारांचा धनादेश दिला तर श्री.सचिनजी कोरडे यांनीही रु. २१ हजारांचा निधी दिला.
यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना रविकांत तुपकर यांनी सांगितले की राजवाडा विरुद्ध गावगाडा अशी ही लढाई असून आपण गेल्या वीस वर्षापासून शेतकऱ्यांकरिता लढत आहोत आपण ग्रामपंचायत सदस्य नाही किंवा जिल्हा परिषद सदस्य नाही कुठलीही निवडणूक लढवली नसून शेतकऱ्यांच्या हिताकरता आपण लाल दिव्याची गाडी लाथ मारली असल्याचे यावेळी रविकांत तुपकर यांनी



सांगितले,कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकरता आपण शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहणार असून आपण सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन सुद्धा त्यांनी केले,
विशेषता घाटाखाली झालेल्या या सर्वांना लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यांनी टाकलेला हा पाठीवरील हात, शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी ताकदीने काम करण्याची ऊर्जा देणारा आहे, अशी भावना रविकांतभाऊंनी यावेळी व्यक्त केली.

# बातमी छापल्याने पत्रकाराला हायवाने ठोकरले

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** अवैध वाळू वाहतुकीची बातमी छापल्याने पत्रकाराच्या दुचाकीला हायवाने ठोकर मारून त्यास जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना ६ जानेवारी रोजी वडोदबाजार येथे घडली असून, या प्रकरणी २२ जानेवारी रोजी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
वडोदबाजार येथील पत्रकार हेमंत वाघ यांनी या भागातील अवैध वाळू वाहतुकीची बातमी एका वृत्तपत्रात छापली होती. याचा राग मनात धरून ६ जानेवारी रोजी रात्री ९ वाजता गाव शिवारात वाळूने भरलेल्या हायवाने हेमंत वाघ यांच्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या घटनेत वाघ गंभीर जखमी झाले. त्यांना



तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले. तेथे त्यांनी उपचार घेतले. याबाबत वाघ यांनी २२ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता वडोदबाजार पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून आरोपी शेख रईस (रा. सावंगी) व हायवाचा अनोळखी मालक यांच्याविरोधात वडोदबाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक संभाजी खाडे करीत आहेत.

# चव्हाणवाडीतील मराठा बांधवांची पुण्यात अन्नदान सेवा

## मराठा आरक्षण प्रश्नी पायी चालत आलेल्या मोर्चाला अन्नदान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मराठा आरक्षण प्रश्नी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे समाज बांधवांसह मुंबईच्या दिशेने निघालेले आहेत.राज्यातील मराठा बांधव हा या पायी मोर्चात एकवटलेला आहे.अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघालेला मराठा आंदोलनाचा पायी मोर्चा हा पुणे जिल्ह्यात दाखल झाला.यावेळी मोठ्या संख्येने एकत्रित आलेला जनसमुदाय पाहायला मिळाला.या आंदोलकांची गैरसोय होऊ नये म्हणनू अनेकांकडून या आंदोलकांना अन्न देण्यासाठी प्रयत्न होताना दिसून आले.फलटण तालुक्यातील चव्हाणवाडी या गावच्या सकल मराठस समाज बांधवांनी पुण्यातील वाघोलीच्या परिसरात अन्नदान केले.या सेवे बद्दल चव्हाणवाडीतील सकल मराठा बांधवांचे कौतूक होऊ लागलेले आहे.पायी चालत आलेल्या आपला



मराठा बांधव हा उपाशी राहता कामा नये म्हणून चव्हाणवाडीतील सकल मराठा समाज बांधवांनी आदल्या दिवशी एकत्र येत बैठक घेतली. आंदोलन कर्त्यांना अन्नसेवा करण्याचा निर्णय बैठकीतून घेण्यात आला.प्रत्येक घरातून चपाती भाकरी घेत असताना गावातून जवळ पास दोन हजार ते अडीज हजार चपाती आणि भाकरी घेऊन वाघोली येथे मुक्कामी असलेल्या आंदोलन कर्त्यांकडे देण्यात आल्या.या ठिकाणी असलेल्या आंदोलन कर्त्यांनी सुद्धा या सेवे बद्दल विशेष धन्यवाद दिले.आम्ही इथले स्थानिक नसून सातारा जिल्ह्यातील चव्हाणवाडी या छोटयाशा गावातुन हे अन्न घेऊन आल्याचे आंदोलनकर्त्यांना समजताच त्यांनी सुद्धा या सेवे बद्दल सर्वांचे कौतुक केले.यावेळी चव्हाणवाडीतील मराठा बांधवांशी संवाद सुद्धा साधला.एका वयोवृद्ध व्यक्तीने आता आरक्षण मिळाल्या शिवाय परत माघारी फिरायचेच नाही.असे म्हटल्याने एक वेगळाच जोश मराठा बांधवांना पाहायला मिळाला.

हे सर्व अन्न घेऊन जाण्यासाठी आदर्कीचे सरपंच सौरभ भैय्या निंबाळकर यांनी स्वेच्छेने आणि उत्स्फूर्तपणे गाडीचा संपूर्ण खर्च दिला.त्याबद्दल सकल मराठा समाज चव्हाणवाडी यांच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानण्यात आलेले आहे.२६ जानेवारीला मुंबईकडे चव्हाणवाडीतील मराठा बांधव जाणार आहेत.यासाठी गावातील लोकांकडून आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.शिवाय जाताना कोरडा शिधा घेऊन जाणार असल्याचे सकल मराठा समाज बांधव यांच्या वतीने सांगण्यात आलेले आहे.



# रोहितदादा पवार यांच्यावर झालेल्या कारवाईचा बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादीच्या वतीने निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा आमदार रोहितदादा पवार यांच्यावर ईडीने कार्रवाई करुन आज दिनांक 24 जानेवारी रोजी समन्स देऊन चौकशीला बोलावले. ही कार्रवाई राजकीय सूडातुन झाली असुन भाजपा सरकार भितीतुन अश्या कारवाया करीत आहे त्यामुळे त्याचा जिल्हा राष्ट्रवादीच्या वतीने निषेध करीत असल्याचे बुलढाणा जिल्हा प्रवक्ता एडवोकेट करीम खान यांनी एका निवेदनाद्वारे सांगितले आहे. त्यांनी या निवेदनाद्वारे सांगितले आहेकी, लोकशाहीमध्ये विरोधकाना जनतेचा आवाज बनुन संघर्ष करण्याचा अधिकार असतो, परंतु आजच हे राज्यातल खोके सरकार व केंद्र सरकार विरोधकांचा आवाज दाबन्याच काम करीत आहे. ICE इनकम टैक्स, सीबीआई, ईड़ीची 90-95% कार्रवाई फक्त विरोधकावर होत आहे हे विरोधकांचा आवाज दाबन्याच छड़यंत्र आहे, अश्या भेकड़ कारवायाना राष्ट्रवादीचा कार्यकर्ता भिनार नाही आम्ही आदरनीय शरद पवार साहेब, जयंतराव पाटिल, सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वात लढत राहु. रोहित पवार यांच्यावर चालू असलेली गैरकायदेशीर कार्रवाई त्वरित थांबवण्यात यावी अन्यथा जिल्ह्यात तीव्र आंदोलन करू व होनाऱ्या परिणामास शासन जबाबदार राहणार असल्याचे आवाहन त्यांनी दिले. या निवेदनावेळी अल्पसंख्याक जिल्ह्याध्यक्ष एम.डी. साबीर, मोहसीन खान, महादेव भालतड़क, ईरफान खान, आशिष वायझोडे, सिद्धार्थ हेलोड़े यांची उपस्थिती होती.

# कापडगाव येथे शिक्षण परिषद उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** कापडगाव, ता.फलटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष पदी केंद्रप्रमुख आर.आर.रणवरे हे होते.कापडगावचे सरपंच कल्पना खताळ, उपसरपंच प्रवीण खताळ,माजी सरपंच वैभव खताळ जि.प. प्राथ शाळा राजीव गांधीनगर शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा दिपाली कचरे,उपाध्यक्ष सुनिल रासकर हे उपस्थित होते.बाबासो कचरे,संजू गेजगे,मेघा घोडके,मंगेश घोडके,पूनम जाधव,आशा खोमणे,प्रीती जाधव,राणी कचरे आदी मान्यवर उपस्थित होते.शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.तरडगांव केंद्राचे केंद्र संचालक तानाजी वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण परिषद पार पडली.शाळेच्या मुख्याध्यापिका विजयश्री जगताप यांनी प्रास्ताविक केले.उपशिक्षक भगवान खताळ यांनी सूत्रसंचलन केले.गणेश अडसूळ यांनी आभार मानले.यावेळी तरडगाव केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते.




# पोलीस निरीक्षकांच्या हस्ते हेल्मेट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सोनगीर टोल नाका व महामार्ग पोलीस धुळे यांच्या संयोजनाने अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकान साहेब व महामार्ग पोलीस निरीक्षक हेमंत भामरे सर यांच्या उपस्थितीत रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम राबवण्यात आला.कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलन करून व देवांच्या फोटोला पुष्प अर्पण करून करण्यात आली.

ह्या ठिकाणी नागरिकांना अपघाती सुरक्षा व्हावी म्हणून हेल्मेट चे वाटप करण्यात आले व त्यासोबत दहा लक्ष रुपये अपघात विमा देखील देण्यात येत आहे. या कार्यक्रमात महामार्ग पोलीस निरीक्षक हेमंत भामरे यांनी सर रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमात नागरिकांच्या सुरक्षेसाठी वाहनांच्या नियमाबाबतीत व वाहन चालवत असताना काही जीवघेण्या गोष्टी या बाबत माहिती देण्यात आली. मा. हेमंत भामरे यांनी सांगितले की रस्त्यावर कारवाई करणे यासाठी नागरिकांना त्रास व्हावा म्हणून आमचा कुठलाही हेतू नसतो आम्ही त्यांच्या सुरक्षेसाठीच काम करतो हेल्मेट वापरणे यात लाज न बाळगता आपली सुरक्षेतेशी काळजी घ्यावी कारण अपघात झाल्यानंतर शरीराच्या कुठल्याही अवयवाला हानी पोहचली तर ती ठीक होऊ शकते किंवा मनुष्य जगू शकतो परंतु डोक्याला मोठ्या प्रमाणावर इजा झाल्यावर मनुष्य दगावतो किंवा डोक्याच्या आत किरकोळ इजा झाली तर लाखोंचा खर्च लागतो कार चालवत असताना काहींना भ्रम असतो की गाडीचा अपघात झाल्यावर एअर बॅग मुळे आपला जीव वाचू शकतो.

परंतु काहींना या गोष्टी माहित नाही तुम्ही योग्य तो सीट बेल्टचा वापर केला तरच एअरबॅग चा उपयोग होईल अन्यथा त्या ठिकाणी देखील जीव जाऊ शकतो त्यासाठी परिवाराचा एखादी व्यक्ती जाऊ नये हीच आमची तळमळ असते प्रत्येकाने कुठलीही लाज न बाळगता नियमाचे कडेकोट पालन केले पाहिजे असे ह्या ठिकाणी सांगण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकान साहेब,महामार्ग पोलीस निरीक्षक हेमंत भामरे सर,पोलीस उपनिरीक्षक चुनीलाल सैंदाणे,सोनगीर टोल चे कृष्णाराव सर सोनगीर पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस व इतर कर्मचारी पत्रकार बांधव उपस्थित होते.



# ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे पंचशील बौद्ध विहाराचे काम संथगतीने सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील वलवाडी येथील असलेल्या इंदिरानगर व बौद्धवासी राजू दादा मोहिते चौक येथील पंचशील बौद्ध विहाराचे काम गेल्या दोन वर्षापासून संथगतीने सुरू असल्याची तक्रार पंचशील बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नंदू म्हसदे यांनी केली आहे.सदर बुद्धविहाराचे काम लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. धुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले व वलवाडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मुकेश खरात यांच्या विशेष प्रयत्नातून महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे तत्कालीन मंत्री यांच्या माध्यमातून बौद्ध विहारासाठी निधी मंजूर झाला होता. सदर हे काम सहा महिन्याच्या आत पूर्ण करून देण्याचं सांगितलं गेलं होतं. मात्र ठेकेदाराकडून हे काम गेल्या दोन वर्षापासून संत गतीने सुरू असल्याची तक्रार पंचशील बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नंदू म्हसदे यांनी केले आहे.

सदर या कामात दिरंगाई पणा करणाऱ्या ठेकेदारांनी हे काम लवकरात लवकर मार्गी लावावे अन्यथा न्याय हक्कासाठी आवाज उठवला जाईल. असा इशाराही नंदू म्हसदे यांनी दिला आहे. सदर यावेळी पंचशील बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नंदू म्हसदे, उपाध्यक्ष भटू साळवे, सचिव एडवोकेट देविदास बैसाणे मोहन खैरनार, लोटन वाघ, किरण इशी, रमेश बैसाणे, अविनाश नागमल, सुदाम शिरोडे, सनी वाघ, सागर खैरनार, पप्पू मोहिते, सागर चौधरी, सुनील बाविस्कर, गंपू थोरात आदि यावेळी उपस्थित होते.



# शेतकऱ्यांनी शेतजमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवणे काळाची गरज : जयदिप शेटे

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर येथे आयोजित शेतकऱ्यांच्या शेती माहिती अभ्यास दौऱ्या दरम्यान विविध माहिती देत आधुनिक शेतीवर काम करण्याचें आवाहन करण्यात आले. ताजनापुर आज दिनांक २३-०१-२०२४ रोजी उत्तम कापूस निर्मिती कार्यक्रम,कॉटन कॉंनेट आणि संजीवनी सक्षमीकरन विकास संस्था औरंगाबाद गट प्रमुख शेतकरी यांच्या कापूस शेतकऱ्यांचे अभ्यास दौरा आणि पुनरुत्पादक शेती पद्धतींचे प्रशिक्षण वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कॉटन कॉंनेट जिल्हा समन्वयक जयदीप शेटे व यांचे प्रतिपादन आज मितीस शेतकरी आपल्या शेत जमिनीतील सेंद्रिय कर्ब जोपासना आणि वाढी बाबत जागरूक होणे हि काळजी गरज आहे. म्हणून शेतकरी वर्गाने बायोचार पद्धती अबलंबून आपल्या शेतीत यांचा योग्य वेळी योग्य रीतीने वापर करावा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश खंडागळे यांनी केली. अनिता पवार मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व नागसेन घोडेराव सरांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

_बायोचर पद्धती समजावून सांगता संजीवनी सक्षमीकरन विकास संस्था औरंगाबाद एफ एफ अनिल बागडे यांनी बायोचार प्रात्यक्षिक समजावून सांगिलते. १ एकर क्षेत्रासाठी प्रात्यक्षिकसाठी त्रिकोणी आकाराचा गड्डा २मी. लांबी,१.मी खोली,कापसाची वाळलेल्या



काड्या १००० किलो कापसाच्या वाळलेल्या पराठ्या जाळून बायोचार बनवणे . बायोचार तसेच शेतात टाकू नये. त्याचे कंपोस्टिंग करावे. कॅपोस्टिंगसाठी ७ फूट लांबी ४फूट रुंदी ३ फूट उंची चा डिगार बनवावा. ज्या मध्ये बायोचार,जंगल माती,ओला पाला,वाळलेला पाला,गांडूळ खत,जीवामृत,असे सहा थर द्यावेत आणि वरील बाजूला माती टाकून त्यामध्ये चवळीची लागवड करावी हे कंपोस्ट खत दोन महिन्यात तयार होईल. त्याचा वापर प्रति एकरी ३ टन म्हणजेच बायोचार १. ५ टन आणि सेंद्रिय पदार्थ १. ५ दिल्यास ०. १ टक्के सेंद्रिय कर्ब वाढतो.

यानंतर बाबासाहेब मालोदे, सागर निकम यांनी उत्तम कापूस दिनदर्शिका मधील शेतकरी यांना दर माहिन्याला करायची कामे कोणती आहे याची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर शेतकऱ्यांना इनपुट सेंटर शैलेश काळे यांनी सविस्तर माहिती दिली यांनी. यावेळी ताजनापुर गावातील दत्तू काळे, आजिनाथ काळे, दगडू काळे , आप्पासाहेब काळे,अनुराधा चव्हाण तर पंचक्रोशीत गट प्रमुख शेतकरी उपस्थिती होते. कार्यक्रमांसाठी ,संतोष कामठे, आप्पासाहेब चव्हाण, पूजा जाधव, अर्चना जाधव, गणेश जाधव, पवन आवटे, रामधन बोडके, निर्मला खरे, ज्ञानेश्वर जाधव, पुनम बेनाडे परिश्रम घेतले त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# अवैधरित्या रोडचे खोदकाम करणाऱ्यावर होणार गुन्हा दाखल

## अभियंता नितिन राठोड यांचा शेतकऱ्यांना गंभीर इशारा


आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व परिसरात अवैध रित्यांनी डांबरीकरण रोड फोडणा-यांवरती होनार पोलीस कारवाई अज्ञात शेतक-यांनी दहा ठिकाणी जे.सी. बी. च्या सहाय्याने रोड फोडुन प्रमुख जिल्हामार्ग एक आणि प्रमुख जिल्हामार्ग दोन या ठिकाणी अवैध रित्या पाईपलाईन चे खोदकाम केलेल्या शेतक-यांविरोधामधे सार्वजनिक बांधकाम उप विभागाने फर्दापुर पोलीस ठाणे येथे कारवाई करण्यासाठी केली तक्रार दाखल केली आहे. सोयगाव तालुक्यातील सावळदबारा, डाभा, नांदातांडा,घाणेगाव, देव्हारी, पिंपळवाडी, जामठी, रवळा, जावळा, मोलखेडा, घाणेगांव तांडा व फर्दापूर या गावांजवळ अज्ञात शेतक-यांनी कोनतीही परवानगी न घेता अवैध रित्या नविन डांबरीकरण केलेला रोड सर्रापणे जे.सी.बी.च्या सहाय्याने फोडुन पाईपलाईन केलेली आहे त्या अवैधरित्या खोदकाम करना-यांवरती कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार फर्दापुर पोलीस ठाणे येथे सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे नितीन राठोड यांनी फर्दापुर केलेली आहे रोड खोदल्यामुळे मोठमोठे खड्डे पडुन वाहन धारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आणि अपघाताचे संकेत ही दिसुन येत असल्याचे ही सांगण्यात आले अवैध रित्या खोदलेल्या ठिकाणी त्वरीत कॉंक्रीट भरुन रोड क्लेअर करा अन्यथा नविन डांबरीकरण रस्ता खोदकामाच्या खर्चासह गुन्हा दाखल करण्यात येईल अशा गंभीर इशारा सार्वजनिक बांधकाम उप विभागाचे इंजीनियर नितीन राठोड यांनी दिला आहे.

# इतिहास तज्ज्ञ अ.ज. राजुरकर जन्मशताब्दी समारोहाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** २७जानेवारी २०२४ हे चंद्रपूरचे इतिहासकार अण्णाजी जयराम राजूरकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे,त्या निमित्ताने इतिहासकार अ. ज.राजूरकर स्मृती प्रतिष्ठान,चंद्रपूर आणि इतिहास विभाग, लोकमान्य महाविद्यालय वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा जन्मशताब्दी समारोह उद्या २५जानेवारी २०२४ या दिवशी लोकमान्य महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संध्याकाळी ५ वाजता आयोजित केला आहे.या समारोहात 'चंद्रपूरच्या इतिहासाचे संवर्धन आणि संशोधनःदशा आणि दिशा' या विषयावर चंद्रपूरच्या इतिहासाचे अभ्यासक आणि संशोधक श्री.अमित भगत,मुंबई यांचे व्याख्यान आयोजित केले आहे तसेच या समारोहात अ.ज.राजूरकर स्मृती प्रतिष्ठान मार्फत 'चंद्रपूरचे इतिहासकार -अ.ज.राजूरकर' या गौरवग्रंथाचे विमोचन समारोहाचे अध्यक्ष आणि ग्रंथ विमोचक प्रा.श्रीकांत पाटील यांच्यात हस्ते होणार आहे.या समारोपाच्या स्वागताध्यक्ष लोकमान्य महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य डॉ.जयश्री शास्त्री असणार, तरी सर्व इतिहास प्रेमी,अभ्यासक आणि संशोधक यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून चंद्रपूरच्या इतिहासविषयीच्या चिंतनाला हातभार लावावा. अ. ज.राजूरकर स्मृती प्रतिष्ठानचा कार्यक्रम चंद्रपूर येथे कन्नमवार सभागृहात २७ जानेवारी २०२४ ला संध्याकाळी ५ वाजता होईल.या कार्यक्रमात डॉ.र.रा.बोरकर यांचे'चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचा इतिहास'या विषयावर व्याख्यान असून इतिहासकार अ.ज.राजूरकर यांच्या 'चंद्रपूरचे इतिहासकार अ. ज.राजूरकर 'या ग्रंथाचे विमोचन होणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राजूरकर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेले आहे



# कार सेवकांच्या सत्कारासह संगितमय कार्यक्रमाचे भक्तांची मने जिंकली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रामलल्लांच्या आगमनाने सर्वत्र भक्तीमय वातावरण संपूर्ण देशात पहावयास मिळत आहे. धुळ्यातील सनातन प्रचारक व आजची तरुणाई ज्यांना आदराने धर्मयोद्धा संबोधते ते श्री रामभक्त अनुप अग्रवाल यांनी तर शहरात प्रती आयोध्या नगरी साकारून रामभक्तांना एक आगळी वेगळी मेजवानी दिली आहे. संपूर्ण दहा दिवस विविध उपक्रमांच्या माध्यमातून रामनामाचा गजर येथे होणार आहे.

ज्या कारसेवकांमुळे आपण सुखद अनुभव घेत आहोत त्यांच्या प्रती सद्भावना व्यक्त करीत त्यांचा यथोचित सन्मान अनुप अग्रवालांतर्फे या ठिकाणी करण्यात येत आहे. या माध्यमातून त्यांनी केलेला संघर्ष व त्या काळातील त्यांच्या हृदय द्रावक आठवनींना उजाळा यातून होत आहे. व आजच्या पिढीला त्यांचे योगदान यातून कळून येत आहे.

खान्देशातील अजय-अतुल अशी ओळख असणारे गजेंद्र पाटील व मोन्टी पाटील त्यांच्या रामगितांच्या कार्यक्रमाचा आनंद आज हजारो रामभक्तांनी घेतला. रामनामाच्या गजरावर ठेका धरत तल्लीन होऊन सर्व भक्तगण नाचत गात आपला उत्साह द्वीगुणित करतांना या ठिकाणी एक जल्लोषमय वातावरण थंडीच्या कडाक्यातही एक उर्जा निर्माण करीत होते. आज शिरपुरच्या चौधरी बंधुंचा गोल्डन बंड आज संगीतमय कार्यक्रम या ठिकाणी होणार आहे. त्याचाही आनंद भक्तांनी घ्यावा असे आवाहन अनुप अग्रवाल यांनी केले आहे.

# धम्म परीक्षेत प्रगती खुंटेचा दुसरा क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सम्राट अशोकानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी



बुद्धाचे विचार हे पुनर्जीवित केले. आज गौतम बुद्ध यांचा धम्म हा जगात जाऊन पोहचलेला आहे."युध्द नको तर बुद्ध हवे" हे आपण नेहमी ऐकत आलेलो आहोत.बुद्धाचा विचार राग, द्वेष, मत्सर हे सर्व नष्ट करायला सांगत असतो. मानवता पेरणाऱ्या गौतम बुद्धांच्या विचारांची आजही आपल्याला गरज आहे.बुद्धाचे विचार लोकांमध्ये पेरण्यासाठी विविध उपक्रमाची जोड आवश्यक आहे. विविध संघटना विविधता उपक्रम आयोजित करत असते.धम्माचे ज्ञान सर्वांनीच ग्रहण करावे म्हणून धम्म परीक्षेचे सुद्धा आयोजन केले जात असते. विशेष म्हणजे या परीक्षेतुन चांगले गुण मिळविले जात असतात. विश्वरत्न,भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर आधारित बी.जी. वाघ फौउंडेशन जामनेर आणि कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव,"बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्र" यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरिय धम्मपरीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेतून भोळी ता.खंडाळा येथील प्रगती प्रवीण खुंटे या मुलीने व्दितीय क्रमांक मिळविला.तिला या यशाबद्दल एकूण १५ हजार रकमेचे बक्षीस मिळाले.ही परीक्षा शंभर गुणांची घेण्यात आली होती. प्रगती खुंटे हिने १०० पैकी ९९ गुण मिळविले. धम्माबद्दल खूप अभ्यास असलेल्या प्रगती खुंटे या मुलीने या परीक्षेत यश मिळविल्या बद्दल तिचे अभिनंदन सुद्धा केले जात आहे. प्रगती खुंटे हिने इतिहास या विषय ग्रॅज्युएट विद्यार्थीनी आहे. या परीक्षेत सहभागी होता आल्याने प्रगती खुंटे हिने आयोजकांचे आभार मानलेले आहेत.धम्माचे ज्ञान मिळविण्यासाठी अशा परीक्षेचे आयोजन केले पाहिजे, असे प्रगती खुंटे हिने म्हटलेले असून अशा परीक्षेतून सर्वांनी सहभाग घेतला पाहिजे.

# अचानक गारठा वाढल्याने दैनंदिन व्यवहारांवर परिणाम; पिकांना पाणी भरणाऱ्यांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये सर्वत्र थंडी वाढल्याचे चित्र असुण दैनंदिन जीवन तथा व्यवहारांवर परिणाम जाणवत आहे. थंडी संपत आली तरी हिवाळा जाणवला नाही. त्यात उलट हिवाळ्यात पावसाळा जाणवला गेली तीन महिने हिवाळ्यात म्हणावी तसी थंडी पडली नाही. अधूनमधून थंडी दिसून आली मात्र शेवटच्या टप्प्यात हिवाळा थंडी जाणवत आहे.यात गारठा थंड हवा व थंडी वाढलेली आहे. गहु हरभरा अंबा आदिना थंडी पोषक शक्तीवर्धक आहे. मात्र दुसरीकडे मानवी जीवनावर व दैनंदिन व्यवहारावर याचा परिणाम झाला आहे.गारठा थंडी मुळे गरम ऊबदार कपड्यांचा वापर करून ही थंडी जात नाही यात आजारी वृध्द बालके यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. तर दुचाकी वाहनधारकांना याचा मोठा फटका तथा त्रास होत आहे. थंडगारवा त्यात वहान चालवताना वारा त्यामुळे दुचाकी धारकांची चांगलीच कसोटी कसरत सुरु आहे.सकाळीच दैनंदिन शालेय शिक्षण घेणारे विद्यार्थी यांचे हाल सुरु आहे. तर व्यवहारावर याचा मोठा परिणाम झाला आहे. दुकाना सकाळी उशीरा संध्याकाळी लवकर बंद होत आहे. वाहतुक तुरळक झाली आहे तर अति तुरळक नाममात्र वहाने दिसून येत आहे. तर सद्या शेतात पिकांना पाणी भरणी सुरु असल्याने शेतकरी तथा पाणी भरणाऱ्याचे थंडीमुळे हाल होत आहे.शेवटच्या टप्प्यात अचानक थंडीत वाढ झाल्याने नागरिक लहान मोठे परेशान त्रस्त झाले आहे.



# मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण सुरु

## ३१ जानेवारीपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करणे बंधनकारक : नागरिकांनी सहकार्य करण्याचे मनपाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार चंद्रपूर शहरात मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण करण्याचे कार्य सुरु झाले असुन सर्वेक्षण युद्धपातळीवर करण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे ८२५ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्वेक्षण ३१ जानेवारी पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने वेळेचा अभाव लक्षात घेता सर्वे करणाऱ्या प्रगणकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत असुन शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमार्फत दि.२३ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत हे सर्वेक्षण पूर्ण केले जाणार आहे. या सर्वेक्षणात १५४ प्रश्न विचारले जाणार सर्वेतील माहितीची ऑनलाईन नोंद केली जाणार आहे. नियुक्त केलेले अधिकारी आणि कर्मचारी यांना मनपातर्फे ऑनलाईन माहिती घेण्याचे प्रशिक्षण आले असुन सदर कर्मचारी मनपा हद्दीत घरोघरी जाऊन कुटुंबांची माहिती घेत आहेत.

सर्वेक्षणादरम्यात केवळ मराठा व खुल्या प्रवर्गातील कुटुंबांची माहिती प्रश्नावलीद्वारे भरून घेतली जाईल. सर्व प्रगणकांकडे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने दिलेले ओळखपत्र असणार आहे. कुटुंब आरक्षित प्रवर्गातील असल्याची माहिती प्रगणकाला मिळाल्यानंतर त्या कुटुंबाची पुढील माहिती घेतली जाणार नाही.तसेच सर्वेक्षणासाठी भेट दिलेल्या या घरावर MSBCC या पद्धतीची निशाणी नोंदविणार आहे.या सर्वेक्षणाचा कालावधी कमी असल्याने प्रगणक सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरासुद्धा तुमच्या घरी सर्वेक्षणासाठी येऊ शकतात. यादरम्यानच्या कालावधीत आपण घरी उपस्थित राहून सर्वेक्षणासाठी येणाऱ्या मनपाच्या प्रगणकास माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन चंद्रपूर मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांनी केले आहे.





# शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक सेनेच्या वतीने लोहा शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक सेनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात लोहा शहरातील जि.नांदेड जि.प.हायस्कूल व जि.प.अनाथ मुलांच्या वसतिगृहात शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या, पेनी, गुडडे बिस्कीट वाटप करण्यात आले.

यावेळी शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील भांगे, तालुकाध्यक्ष संभाजी पवार, तालुका सल्लागार नागेश स्वामी,मु.अ. हेमंत कंवर, मिडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास सावळे, पत्रकार विनोद महाबळे, सहशिक्षक नंदकिशोर गुंडरे, फारुख शेख, भगवान चव्हाण, राजीव तिडके,सौ.छाया बैस,संजय जाधव, नामदेव जाधव आदी उपस्थित होते.

तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त लोहा तालुक्यातील मौजे.भाद्रा, व सोनमांजरी तांडा येथील जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर यांनी जि.प,प्रा,शाळा जवळा दे.येथे मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त लेखन साहीत्य वाटप केले यावेळी जिल्हा उपाध्यक्ष गंगाधर ढवळे सर, संतोष घटकार सर ऊपस्थित होते.

# जय श्रीरामच्या गजराने दुमदुमली सावळेद्वारनगरी; शोभायात्रेत अलोट गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे हारि हारेश्ववर मंदीरावर आयोजित श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र सावळेद्वार येथे आज भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. कोट्यावधी भारतीयांचे श्रद्धास्थान असलेल्या रामाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. जय श्रीरामच्या गजराने सावळेद्वारनगरी दुमदुमली. शोभायात्रेत राम भक्तांची अलोट गर्दी जमल्याने संपूर्ण सावळेद्वार भगवेमय झाले होते. ट्रकटरवरील श्रीरामाची भव्यमूर्ती शोभायात्राचे आकर्षण ठरले. महिलांकडून जागोजागी प्रतिमांची पूजन करण्यात आले. लेझीम, पावली, हलगी, ढोलताशा आणि डीजेच्या तालावर श्रीरामाचा जयघोष करत तरुणाई थिरकली. यावेळी मोठ्या प्रमाणात रंगीबेरंगी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सावळेद्वार राममय झाले होते. सकाळपासूनच रामभक्तांमध्ये लगबग दिसून आली. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे व उपसरपंच मो आरिफ मो लुखमान यांनी मुख्य रस्त्याची सफाई करून त्यावर सडासंमार्जन व महिलांनी आप आपल्या दारी रांगोळी काढली होती. गावातील हारि हारेश्ववर मंदिरापासून शोभा यात्रेस प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात राम भक्तांचे एकत्रीकरण होऊन भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली.यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. पुरुषांनी पांढरावेश परिधान करून भगव्या टोप्या घातल्या होत्या,तर व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानासमोर श्रीरामाचे होर्डिंग लावले होते.प्राणप्रतिष्ठा सोहळा सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

शोभायात्रा मुख्यरस्त्यावर येताच रामभक्तांची तोफान गर्दी वाढली होती. संपूर्ण सावळेद्वार भगवेमय झाले होते. गळ्यात भगवे रुमाल व डोक्यावर टोपी घालून रामभक्त जय श्रीरामच्या घोषणा देत होते. वारकरी संप्रदाय व विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात पावलीचा ठेका धरला होता. महिलांनी फुगड्या खेळून आनंदोत्सव साजरा केला. शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकात येताच शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवाआप्पा चोपडे,प्रा जीवन कोलते पाटील व उपसरपंच मो आरिफ मो लुखमान पुष्प हार अर्पण करून अभिवादन करून श्रीराम प्रभूंच्या घोषणा देण्यात आल्या. श्रीचक्रधर स्वामी मंदिर, हनुमान मंदिर, शिवसेना चौक मार्गे हारि हारेश्ववर मंदीरावर शोभयात्रेचा समारोप करण्यात आला.

शेवटी श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथून होणाऱ्या रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण विठ्ठल रुक्मिणी सभागृहात रामभक्तांना दाखवण्यात आले. शेवटी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवाआप्पा चोपडे व मित्र मंडळ यांच्या वतीने पेढे प्रसादाचे वाटप करण्यात आले.श्रीराम प्रभूंच्या मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी फर्दापूर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक सुरेश माळी बिट जमादार मिरखाॅ तडवी प्रकाश कोळी भरत कोळी व होमगार्ड कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता अशी माहिती मुख्याध्यापक योगेश चोपडे यांनी बोलताना दिली.





# महाविकास आघाडीच्या वतीने हिंदुऱ्हदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना अभिवान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** हिंदुऱ्हदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब यांची ठाकरे विठ्ठल चौक येथे जयंती साजरी करण्यात आली शिवसेनाप्रमुख हिंदुरुदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाविकास आघाडीच्या वतीने विठ्ठल चौक विठ्ठल नगर येथे जयंतीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला ज्येष्ठ शिवसैनिक पंडित आंबेकर, सांडू मुरदारे, काशिनाथ वाघ, कारभारी वाहुळ, अंकुशराव चौधरी भास्कर पठारे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुष्प अर्पण करून पूजन करण्यात आले या वेळी सुभाष पांडभरे पाटील , गंगाराम कापसे , भास्कर लहाने ,राहुल सावंत यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यावर मार्गदर्शन केले यावेळी महाविकास आघाडीचे संदिपान बापू, काळे सतीश काळे ,सचिन वाघ ,किशोर बिनीवाले, तुकाराम साबळे, उमेश कापसे, राजगुरू साहेब, दीपक मस्के, दशरथ मानवतकर, मीरा पाटील, संतोष लींबेकर, पंडित बोरसे, विजय पाटील, गणेश शेजुळ ,राजू राऊत, नाना जगताप जयस्वाल अण्णा , पंजाब मगर, या कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल नगर श्रीराम नगर संघर्ष नगर येथील महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले होते. सूत्रसंचालन विष्णू गुंठाळ यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वल्लभ भंडारी यांनी केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# चेतना इंग्लिश स्कूलमध्ये अवतरली रामनगरी

आधुनिक केसरी न्यूज

**देगलूर :** शहरातील चेतना इंग्लिश स्कुल येथे प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंद लुटत रामलीला साजरी करण्यात आली.
५०० वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर सर्व भारतवासीयांच्या अभिमानाचा विषय ठरलेल्या अयोध्या येथे श्री राममुर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने चेतना इंग्लिश स्कुल येथे दिनांक २१ जानेवारी रोजी रामलिलेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने रामलीला सादर केली. यात श्रीकांत यरमुने, मैत्रेयी महाजन, स्वरा ढगे, प्रतीक मसुरेवार, पार्थ भिसे, सर्वेश ठोसर, आदींनी सहभाग घेतला... रामलीले सोबतच विद्यार्थ्यांनी, मेरे घर राम आएंगे स्वरा ढगे व संच, किजो केसारी के लाल मैत्रेयी महाजन संच, गली गली अवध सजाएंगे .... यावर वेदश्री गायकवाड हिने वैयक्तिक मंत्रमुग्ध करणारे नृत्य केले. सदरील कार्यक्रमास भाजप शहराध्यक्ष प्रशांत दासरवार, जिल्हा सरचिटणीस भाजपा श्री दिगंबर कौरवार , डॉक्टर शुभम पाटील आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सदरील कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शाळेच्या प्रांगणात जमले होते. संस्थेच्या अध्यक्षा सौ. मंदाकिनी महाजन, यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व रामाच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. मुख्याध्यापिका सौ. रोहिणी महाजन यांच्या कार्यक्रमाच्या सुत्रसंचालनाने कार्यक्रमास रंगत आणली. श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने रामरक्षा स्तोत्र पुस्तिका सर्व आमंत्रित पाहुणे व पालक विद्यार्थी यांना देण्यात आली, सर्वांनी श्रीरामरक्षाचे



सामूहिक पठण केले व रोज एकदा राम रक्षा म्हणण्याचा संकल्प केला...दिगंबर कौरवार यांच्या तर्फे शाळेत विद्यार्थ्यांना शालेय पॅड चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून झाला. सदरील प्रसंगी शाळेच्या विशेष सजावटीसाठी शाळेचे व्यवस्थापक श्री बालाजी मुत्तेपवार, साक्षी मिस व सुप्रिया मिस, आश्विनी मिस, स्वरूपा मॅडम, दिपाली मॅडम व निकिता मॅडम यांचे महत्वाचे योगदान लाभले. सौ. शालिनी जोशी यांनी काढलेली 5X10 फुटांची भव्य श्रीरामाची विशेष रांगोळी हे संपूर्ण कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. सौ. शिळवणीकर व सौ. चिद्रावार (काप्रतवार) या पालक प्रतिनिधी नी शाळेच्या उपक्रमाविषयी आपले विचार मांडले... कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव श्री मयूर महाजन यांनी केले.



## रिसोड पोलीस स्टेशन ठाणेदारपदी गावंडे रुजू

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**
**रिसोड :** पोलीस स्टेशनेमध्ये आता, नवा गडी नवा राज सुरू झाला आहे. वाशिम पोलीस दलाच्या वतीने आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस महासंचालकांनी दिलेल्या आदेशानुसार पोलीस दलातील पात्र अधिकाऱ्यांच्या बदल्या जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या आदेशाने करण्यात आल्या आहेत यामधे पोलीस अधीक्षक यांच्या दिनांक १३ जानेवारी 2024 रोजी दिलेल्या आदेशानुसार रिसोड येथील ठाणेदार देवेंद्र सिंग ठाकूर यांची बदली वाशिम शहर येथे करण्यात आली आहे.तसेच भूषण रामराव गावंडे यांची रिसोड पोलीस स्टेशनच्या ठाणेदार पदी निवड करण्यात आली आहे. नवीन ठिकाणी नेमणूक करण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे सर्व प्रकारची कामे संबंधित अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करून बदली पदस्थापना झालेल्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे असे आदेश बदली झालेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्या नुसार दिनाक 23 जानेवारी रोजी भूषण गावंडे यांनी रिसोड ठाणेदार पदाची सूत्रे स्वीकारली.

याआधी त्यांनी वाशिम, बुलढाणा जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनमध्ये दबंग कामगिरी बजावली असून धाडसी कारवाई करण्यासाठी त्यांची ख्याती आहे.विविध संघटनांकडून गावंडे यांचा सत्कार ही करण्यात आला आहे यामधे व्हॉईस ऑफ मीडिया रिसोड तालुक्याच्या वतीने यथोचित सत्कार करून चांगल्या कामामध्ये सहकार्य करण्याची भूमिका मांडण्यात आली. मात्र जिल्ह्याची राजकीय राजधानी असलेले रिसोड पोलीस स्टेशनचा कारभार नवखे ठाणेदार भूषण गावंडे हे कशा प्रकारे पार पाडतात याकडे सर्व रिसोड वासियांचे लक्ष लागले आहे.

## प्रेयसीवर वार करत स्व:ताचा गळा कापून घेतला

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** अनैतिक संबंधात वाद झाल्याने प्रियकराने विवाहित प्रेयसीची चाकूने सपासप वार करून हत्या केली व नंतर स्वतःचा गळा कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना अकोला जिल्ह्यातील माना येथे मंगळवारी सायंकाळी घडली. अनिल श्रीकृष्ण तायडे (४५ रा. लोहारी, ता. अकोट) असे आरोपीचे नाव असून त्याला सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
अनिल श्रीकृष्ण तायडे याचे माना येथील ३६ वर्षीय महिलेसोबत अनैतिक प्रेमसंबंध होते. यातूनच तो अनेकदा भेटायला जात होता. मंगळवारीही तो त्याच्या प्रेयसीला भेटायला माना येथे येऊन तिच्या घरी गेला व शरीर सुखाची मागणी केली. यावेळी दोघांमध्ये मोठा वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर अनिल तायडेने त्याच्या प्रेयसीच्या गळ्यावर चाकूने सपासप वार केले. ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतरही तिच्या पोटावर चाकूचे वार केले. ती मृत झाल्यावर आरोपीने चाकूने स्वतःचा गळा कापून घेतला.



## पोलीस अधिकाऱ्याचा निरोप समारंभ बनलाय चर्चेचा विषय

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** लासलगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नि राहुल वाघ यांची नाशिक ग्रामीण विशेष शाखेत बदली झाली. पोलीस पाटील, नागरिक व पत्रकारांनी त्यांना अनोख्या पद्धतीने निरोप दिला आणी हा निरोप समारंभ पंचक्रोशीत चर्चेचा विषय बनला. शासकीय अधिकारी येतात आणि बदली होऊन जातात. मात्र काही अधिकारी हे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा बळावर सर्वसामान्य नागरिकांच्या गळ्यातील ताईत बनतात तसेच लासलगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी राहुल वाघ दबंग व जिगरबाज अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी सव्वातीन वर्षाच्या काळात सर्वसामान्य लोकांशी संपर्क वाढवत त्यांना आपलेसे केले. हद्दीतील गुन्हेगारीला आळा घालण्यात यश मिळवले. शेतकरी आंदोलन असो व मराठा आंदोलन त्यांनी व्यवस्थित हाताळले. प्रत्येक वेळी कायद्याचा वापर न करता वादी व प्रतिवादी यांचे व्यवस्थित समुपदेशन करून वाद मिटवले. त्यामुळे त्यांची कार्यपद्धती जनसामान्यांच्या पसंतीस उतरली.
त्यांनी पोलीस ठाणे आवारात भव्य असे दत्त मंदिर बांधण्यात पुढाकार घेऊन पूर्ण केले. प्रत्येक वर्षी दत्तजयंतीला मोठा उत्सव साजरा करण्यात येऊन सुमारे ३ हजार नागरिकांना भंडारा देण्यात येतो. त्यामुळे त्यांनी सर्वच क्षेत्रातील नागरिकांमध्ये लोकप्रियता मिळवली. त्यांच्या बदलीनंतर पोलीस पाटील, नागरिक व पत्रकारांनी त्यांच्या भव्य निरोप समारंभाचे आयोजन केले. त्यानंतर त्यांची उघड्या जीपमधून सवाद्य मिरवणूक, विद्युत रोषणाई, आतिषबाजी फुलांची उधळण करीत निरोप दिला. त्यामुळे त्यांचा हा निरोप समारंभ परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.




## जनसामान्यांचा आवाज व्हॉईस ऑफ मीडिया : संतोष चऱ्हाटे

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**
**वाशिम:** देशातील सर्वात मोठी पत्रकारांची संघटना असलेली व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार व पत्रकारितेला भेडसावणाऱ्या समस्या सोबतच तळागाळातील लोकांच्या समस्यांना वाचा फोडणारी संघटना म्हणून संपूर्ण देशात लोकप्रिय झाली असल्याचे प्रतिपादन व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य संघटक तथा रिसोडचेनगर सेवक संतोष चऱ्हाटे यांनी केले आहे. रिसोड शहरात येणाऱ्या प्रमुख महामार्गावर व्हॉईस ऑफ मीडियाकडून स्वागत फलक लावण्यात आले आहेत. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चऱ्हाटे बोलत होते.

व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, प्रदेशउपाध्यक्ष अजित कुंकलोळ यांच्या मार्गदर्शनाखाली जनसामान्यांचे आदरतिथ्य करण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून शहराला जोडणाऱ्या प्रमुख महामार्गावर स्वागत फलक लावण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने रिसोड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, जिल्हा उपाध्यक्ष आकाश शिंदे यांच्या हस्ते सदर फलकाचे अनावरण करण्यात आले आहे.

देशातील नंबर वन असलेली व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने रिसोड शहरांमध्ये अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी मालेगाव नाका, जिजाऊ चौक, वाशीम नाका, मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर आणि छत्रपती शिवाजी नगर वाशिम रोडवर स्वागताचे नामफलक लावण्यात आले आहे. या फलकाचे अनावरण व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदिप काळे प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के उपाध्यक्ष अजितदादा कुंकलोळ यांच्या मार्गदर्शनाखाली व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी जिल्हा उपाध्यक्ष आकाश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य संघटक संतोष चराटे यांच्या पुढाकारातून राज्य कार्यकारिणी सदस्य अर्जुन खरात, विवेकानंद ठाकरे, शेख अन्सार, वसंत खडसे, ताराचंद वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या फलकाचे अनावरण करण्यात आले, प्रसंगी व्हॉईस ऑफ मीडियाचे रिसोड तालुकाध्यक्ष विनोद बोडखे उपाध्यक्ष महादेव घुगे, सचिव रुपेश बाजड कार्याध्यक्ष दिपक शेवाळे,सुरेश गिरी, नाजीम खान, महिंद्र महाजन हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश पाटील बाजड यांनी केले तर आभार प्रदर्शन विनोद पाटील बोडखे यांनी मानले.

## भोकरला आज नमो नवं मतदाता संमेलन

### श्रीकांत किन्हाळकरांची माहिती : खा. चिखलीकरांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** देशभरात नवीन मतदार व युवकांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नमो नवं मतदार संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.शहरात गुरुवारी (ता. २५) खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत संमेलन होणार असल्याची माहिती विधानसभा संयोजक श्रीकांत किन्हाळकर यांनी दिली आहे.
#आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षानी कंबर कसली असून नवीन मतदारांपर्यंत कसे पोहोचता येईल याची विविध माध्यमे तयार करून भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांना नवीन कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी ही नामी संधी उपलब्ध करून दिलेली आहे. याची ईतंभुत माहिती खासदार श्री. चिखलीकर देणार



आहेत. नवीन अजिंठा अग्रस्थानी ठेवून विधानसभेचे संयोजक श्रीकांत पाटील किन्हाळकर यांनी आयोजन केले आहे. शहरातील किनवट रस्त्यावरील माऊली मंगल कार्यालयात गुरुवारी सकाळी ठीक १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.यावेळी खासदार श्री. चिखलीकर व नांदेड लोकसभा प्रभारी प्रणिता ताई देवरे चिखलीकर, गंगाधर जोशी, ॲड किशोर देशमुख, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदीप राठोड यांची उपस्थिती राहणार आहे संमेलनात पंचक्रोशीतील नवयुवकांनी सहभाग नोंदवावा व आपले पहिले मत हे देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करावे असे आवाहन विधानसभेचे संयोजक श्रीकांत किन्हाळकर यांनी केले आहे.

# विजयअण्णा कासार यांना 'दान चिंतामणी' पुरस्कार

## अमृतमहोत्सवानिमित्त विविध संस्थांना दहा लाख रुपयांचे दान

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** एखाद्या गरजू व्यक्तीला, संस्थेला, विद्यार्थ्यांना वस्तू किंवा पैशाच्या रूपाने दान देत असतो तेव्हा ते घेणाऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून मला खूप आनंद होतो व हा आनंद मिळविणे हा माझा त्यामागे स्वार्थ आहे, या स्वार्थापोटीच मी हे काम करीत असतो, अशी प्रांजळ भावना जैन कासार संस्थेचे केंद्रीय उपाध्यक्ष विजयअण्णा कासार यांनी अमृतमहोत्सवी कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली. पुणे येथे दिगंबर जैन कासार समाज संस्थेच्या वतीने अध्यक्ष पोपटलाल डोर्ले, कार्याध्यक्ष प्रकाश मांगले यांच्या हस्ते 'दान चिंतामणी' हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ, मानपत्र, पुष्पहार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उत्तरादाखल विजयअण्णा बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पोपटलाल डोर्ले उपस्थित होते.

प्रारंभी कासार कुटुंबियांच्या वतीने औक्षण करण्यात आले. अमृतमहोत्सवच्या निमित्ताने कासार यांनी दहा लाख रुपयांचे विविध संस्थांना दान दिले. व्यासपीठावर सौ. सरिता विजयअण्णा कासार, योगेश व निरज ही दोन्ही मुले, सुना उपस्थित होते. कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्व यांचा त्रिवेणी संगम म्हणजे विजयअण्णा कासार. आपल्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमात विविध संस्था, ग्रामीण-शहरी भागातील जैन मंदिरे, शिष्यवृत्ती वाटप करणाऱ्या संस्था, जलप्रदूषणावर काम करणारी संस्था, निराधार कुटुंबांना जीवनोपयोगी साहित्यासाठी निधी असे एकूण १० लाख रुपयांचे दान विजयअण्णा कासार व त्यांच्या कुटुंबियांनी आजच्या कार्यक्रमात केले. 'दाने दाने पे लिखा है खानेवाले का नाम ... त्यामुळे ते त्यांचच होतं ते त्यांना मिळालं ही उदात्त भावना ठेवून जैन संस्कारातून मिळालेले अपरिग्रहाचे तत्त्वज्ञान अंगिकारून हे दान त्यांनी दिले. या कार्यक्रमात विजयअण्णांच्या समर्पणामागचा उदात्तपणा सर्वांना दिसून आला. आजपर्यंत अर्धा कोटी रुपयांपर्यंत दान केलेले आहे. दातृत्वात खुप पुढे असलेल्या अण्णांमध्ये एक भाबडी आणि विशुद्ध अशी संपन्न, प्रसन्न व समाधानाची प्रवृत्ती सर्वांना दिसली, त्यात त्यांना मिळणारा अलौकिक संतोष, आनंद त्यांच्या चेहऱ्यावर सतत जाणवत होता.

यावेळी महाराष्ट्रातून जैन कासार समाज संस्थेचे अध्यक्ष पोपटलाल डोर्ले, दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन रावसाहेब पाटील, प्रा. एन.डी. बिरनाळे (सांगली), अकोल्याचे मांगुळकर, उदय लेंगडे, मोहन डोर्ले, प्रदीप फलटणे (पुणे), अशोक साळवी, हुकुमचंद हेसे, महावीर दुरुगकर (सोलापूर), प्रकाश मांगले, अरुणा मांगले (मुंबई), सुकुमार पोते (इचलकरंजी), महामंत्री अजित शिराळकर (रत्नागिरी), विलास वानरे, मंगेश विभुते (परभणी) आदींनी विजयअण्णा शतायुषी व्हावेत यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. भ. महावीरांच्या जगा व जगू द्या या तत्त्वाचा खरा जैन पाईक म्हणून त्यांनी समाजासमोर दातृत्वाचा आदर्श ठेवला आहे. ते खरे दान चिंतामणी आहेत असे प्रतिपादन चेअरमन रावसाहेब पाटील यांनी केले.

यावेळी बोलताना अध्यक्ष पोपटलाल डोर्ले म्हणाले, जैन कासार समाज संस्थेच्या उभारणीत अण्णांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या प्रेरणेतून व आर्थिक मदतीमधून सुरू झालेले 'जैन कासार समाचार' हे मासिक मागील दहा वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत अण्णांचे लक्ष असते. कोणताही विद्यार्थी आर्थिक विवंचनेमुळे उच्च शिक्षणापासून दूर राहू यासाठी खूप प्रयत्नशील असतात. यासाठीच त्यांनी दक्षिण भारत सभेच्या विद्यार्थी शिष्यवृत्ती फंडाला आजपर्यंत बारा लाख रुपयांचे दान दिले आहे. मागील दोन वर्षांपासून कोकणातील दुर्बल समाज बांधवांना जीवनाश्यक वस्तुंचे वाटप करीत आहेत. आजकाल दातृत्व असलेल्या व्यक्तीची वानवा आहे.

यावेळी शुभेच्छा देताना प्रा. अशोक साळवी म्हणाले, शंभरात एक शूर निपजतो, हजारात एक पंडित असतो, दहा हजारात एक वक्ता मिळतो पण दानशूर व्यक्ती मिळणे अवघड झाले आहे. जैन संस्कृतीमध्ये त्यागाला व दानाला खूप महत्त्व आहे. प्रत्येकांनी काहीतरी दान करावे, असे शास्त्र सांगत असते. चांगले सत्कर्म म्हणजेच दान असून विजयअण्णांनी कृतीतून दानधर्म केला आहे. यावेळी हुकुमचंद हेसे, सुकुमार पोते आदींनीही शुभेच्छा दिल्या.

मानपत्राचे वाचन व कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन प्रा.सुभाष दगडे यांनी केले. यावेळी विविध संस्थांनी अण्णांचा सत्कार केला. मोतीलाल वनकुद्रे, विनोद डोर्ले, अभिजित मांगले, योगेश कासार, निरज कासार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

> कुटुंबांची जबाबदारी हे आपले कर्तव्य आहे, पण समाजऋण आपल्यावर असते, याची जाणीव ठेवून त्यातून उतराई होण्याचा प्रयत्न आपल्या परीने सर्वांनी करावा. आज मला सर्वांचे खऱ्या अर्थाने आभार मानायचे आहेत. समाजाचं माझ्यावर प्रेम तर आहेच पण आमच्या कुटुंबाशी जोडलेल्या दोन्ही सुना या संस्कारित आहेत. आम्हाला त्या मुलीसमानच आहेत. निवृत्तीच्या काळात मुलांपेक्षा सुनाच जास्त काळजी घेतात हा मला आत्मविश्वास आहे. माझ्या प्रत्येक कार्यात सावलीप्रमाणे पाठीशी उभी राहिलेली पत्नी सरिता हिचे योगदान अतुलनीय आहे. त्यामुळे मी समाजासाठी कार्य करीत राहतो यातून आत्मिक खूप समाधान व आनंद मिळतो हेच माझ्यावर समाजचं ऋण आहे, असं मानतो. समाजकार्यामुळे महाराष्ट्रातील अनेक बांधवांचा माझ्याशी स्नेह निर्माण झाला. आज विदर्भ, मराठवाडा, कोकण आदी भागातून समाजबांधव उपस्थित आहेत याचा मला खूप आनंद आहे. त्यामुळे सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो.
> विजयअण्णा कासार.




# बालकल्याण समिती बरखास्त करा

## अन्नत्याग उपोषण : विदयार्थी संघटना ठाम

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** खडके बालगृह अत्याचार प्रकरणी गुन्हे दाखल असलेल्या बालकल्याण समितीला बरखास्त करण्यात यावे या मागणीसाठी गेल्या पाच दिवसांपासून महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनचे सुरु असलेल्या अन्नत्याग उपोषनाला आज दिनांक २३ जानेवारी रोजी जळगाव जिल्हा वकील संघाने पाठिंबा दिला. महाराष्ट्र स्टुडंट युनियनचे राज्य उपाध्यक्ष ऍड. दीपक सपकाळे, जिल्हाध्यक्ष रोहन महाजन, महानगराध्यक्ष प्रथमेश मराठे यांनी दि. १९ पासून उपोषण सुरू केले आहे. दरम्यान विविध सामाजिक संघटना यांनी उपोषणस्थळी भेट देत पाठिंबा दिला आहे. बाल लैंगिक सारख्या गंभीर प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या बालकल्याण समितीने नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देणं अपेक्षित होतं मात्र तसं न झाल्याने पीडित बालिकांना न्याय मिळवून देण्यासाठी 'मासू' विद्यार्थी संघटनेने बेमुदत उपोषण सुरु केले आहे, उपोषणाला ५ दिवस उलटून देखील समिती बरखास्त करण्यासंदर्भात निर्णय घेतलेला नाही. बाल कल्याण समितीतील तीन पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर सदर सदस्यांची राज्य चौकशी समितीद्वारे ऑगस्ट - २०२३ महिन्यातच चौकशी पुर्ण झालेली आहे. खडके बालगृह अत्याचार प्रकरणी एरंडोल पोलीस स्टेशन येथे दि.२६.०७.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे.प्रकरण गंभीर असून समिती बरखास्त होतं नसल्याने आश्चर्य वाटत असल्याचे उपोषणकर्त्यांचं म्हणणं आहे.जळगाव जिल्ह्यातील खडके, ता. एरंडोल येथे कै. य. ब. पाटील मुलींच्या बालगृहात लैंगिक शोषणाची गंभीर स्वरुपाची घटना घडल्या प्रकरणी बाल कल्याण समितीचे अध्यक्ष श्रीमती देवयानी गोविंदवार, सदस्य श्रीमती विद्या बोरनारे व सदस्य श्री. संदीप पाटील यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बालकल्याण समितीच्या बरखास्तीसाठी सुरु असलेल्या अन्न त्याग उपोषणास जळगाव जिल्हा वकिल संघाच्या वतीने जाहीर पाठींबा देण्यात आला असून उपोषणस्थळी वकील संघांचे अध्यक्ष ॲड. रमाकांत पाटील, सचिव कल्याण पाटील, माजी सचिव ॲड. आनंद मुजुमदार, माजी सचिव सुभाष तायडे, माजी अध्यक्ष कैलास भाटीया, मा. विधी सरकारी वकील ॲड. राजेश गवई, ॲड, सुनिल इंगळे, ॲड. लिना म्हस्के, ॲड. वैशाली चौधरी, ॲड. पल्लवी जोशी, ॲड. परिनिता फेगडे, ॲड. रुपाली शिवदे, ॲड. माधुरी बडगुजर, ॲड. निशांत शिंपी, ॲड. दिपक सोनवणे, ॲड. राजकुमार हरणे, ॲड. अर्जुन खैरनार, ॲड. सुकलाल सुरवाडे, ॲड. समाधान सुरवाडे, ॲड. दाजीबा भालेराव, ॲड. अरुण चव्हाण, ॲड. प्रशांत बाविस्कर यांनी भेट देत पाठिंबा दिला आहे.

> १) पोक्सो कायद्यान्वय गुन्हा असणारी बाललैंगिक शोषणाची, गुन्ह्याची माहिती असतांना देखील माहिती दडवून ठेवत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल न करता आरोपीची एक प्रकारे साथ देऊन गुन्ह्यात सहभाग असलेल्या बाल कल्याण समितीतीचे अध्यक्ष - श्रीमती देवयानी गोविंदवार, सदस्य - श्रीमती विद्या बोरणार, सदस्य - संदिप पाटील या तिघांचे तात्काळ निलबंन करण्यात यावे.
> २) बाल कल्याण समितीतील अध्यक्ष /सदस्य ही समिती तात्काळ बरखास्त करण्यात यावी.
> ३) या तीन महाशयांना या पुढे शासनस्तरावर कोणत्याही शासकीय समितीच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात येवु नये.
> ४) या तीन महाशयांना बालकल्याण समिती येथे येण्यास प्रतिबंध करण्यात यावा.

# भरवस फाट्यानजीक गोमांस असल्याच्या संशयाने मोटारसायकल जाळली

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भरवस फाटा पेट्रोल पंपानजीक मोटारसायकल वरून गोमांस वाहतूक करीत असल्याचा संशय आल्याने आगळीकीच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीकडून मोटारसायकल जाळण्यात आली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, ईस्तीहाक इसाक कुरेशी रा.चांदणीचौक ओझर व एक अज्ञात हे एम.एच १५ जी.एस ९९५५ पासिंगच्या स्कुटीवरून गोणीतून १९ हजार रुपये किमतीचे ६० किलो मांस ताब्यात बाळगून वाहतूक करत होते. हे गोमांस असल्याच्या संशयावरून त्यांना अडवून अज्ञात इसमाने आगळीक करण्याचे उद्देशाने ५ हजार रुपये किमतीची स्कुटी जाळुन टाकली. याप्रकरणी पो.ना.किशोर लासुरकर यांचे फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे सुधारित अधिनियम २०१५ चे कलम ५ (अ)५(क), ९,९ (अ) सह भा.द.वि क ४३६ प्रमाणे लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. स.पो. नि भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.वसंत हेंबाडे अधिक तपास करीत आहेत.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# आपापसांतील वैरभाव संपुष्टात आणून एकीचे बळ वाढवा : भदंत पंय्याबोधी थेरो

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आपण आपल्यातील अहं सोडून द्यायला हवा, मी मोठा तो लहान अशी श्रेष्ठ कनिष्ठतेची श्रेणी त्यागायला हवी, मान सन्मान बाजूला ठेवावेत तसेच आपापसांतील वैरभाव संपुष्टात आणून एकीचे बळ वाढविले पाहिजे असे प्रतिपादन येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी तालुक्यातील तळणी येथील पहिल्या बौद्ध धम्म परिषदेत केले. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राची धम्मदान व धम्मसंदेश यात्रेचे आगमन तळणी येथे झाल्यानंतर धम्मदेसना देतांना भदंत पंय्याबोधी थेरो यांनी मार्गदर्शन केले. बौद्ध धम्म परिषदेत



ध्वजारोहण, ग्रंथवाचन, भोजनदान, धम्मदेसना तसेच माधव वाढवे, विजय सातोरे, काजल सातोरे यांच्या बुद्ध भीम गीत गायन आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

तालुक्यातील तळणी येथे समस्त बौद्ध उपासक उपासिका यांनी पहिल्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ध्वजारोहण व ग्रंथवाचन संपन्न झाले. दुपारी सर्व उपस्थितांना भोजनदान देण्यात आले. भिक्खू संघाच्या आगमनानंतर तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. धम्मदेसना देतांना भदंत पंय्याबोधी थेरो पुढे म्हणाले की, सद्याचा काळ बौद्धांच्या राजकीय भविष्यासाठी खडतर आहे. त्यासाठी आपण सर्वच एक होणे काळाची गरज आहे. ८ जानेवारी रोजी महाधम्मध्वज महापदयात्रेच्या निमित्ताने सर्वपक्षीय बौद्ध नेते एकत्र आले होते. आपण आता एकत्र येऊन एकतेचे सौंदर्य स्थापित केले पाहिजे, ह्यातच आपले भले आहे.

## नागपुरात दोन गुन्हेगार जेरबंद; दोन पिस्तूल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नंदनवन पोलिसांनी दोन गुन्हेगारांना अटक केली. त्यांच्याकडून दोन पिस्तूल आणि ७ काडतूस जप्त केले. नौशाद अंसारी (२०), मो. शाकीब (२२) दोन्ही रा. हसनबाग अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. रविवारी रात्री नंदनवन पोलिसांचे पथक गस्त घालत असताना दोन युवकांकडे पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. पथकाने हसनबागच्या गल्ली नंबर ५ मध्ये घेराव करून नौशाद आणि शाकीब या दोन संशयितांना ताब्यात घेतले. हे दोघेही पप्पू पटेल या गुन्हेगाराकडे काम करायचे. दोघेही ट्रॅव्हल्सच्या कामावर होते. पप्पूवर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद आहे. तीन महिन्यांपूर्वी दहशतवादी विरोधी पथकाने त्याच्या घरी धाड मारून आक्षेपार्ह साहित्य जप्त केले होते. तेव्हापासून त्याचे ट्रॅव्हल्सचे काम कमी झाले. दोघांनीही काम बंद केले होते. गेल्या काही दिवसांपासून पप्पू घरून फरार आहे. पोलिसांनी सखोल विचारपूस केली असता, दोन पिस्तूल पप्पू पटेल याच्याकडून घेऊन घरी ठेवल्याचे नौशादने सांगितले. त्याच्या घराची झडती घेतली असता लोखंडी कपाटात पिस्तुलासह चार जिवंत काडतूस तर शाकीब याच्याकडे पिस्तूलसह तीन जिवंत काडतूस मिळाले.



## मोदी साहेबांचे स्वच्छता अभियान धुळ्यात अपूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सध्या नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छता मोहीम राबवण्याबाबत मोठी घोषणा केली असता धुळे जिल्ह्यातील खासदार अकीकडे सफाई करत असताना फोटो व्हायरल होत आहे परंतु त्याच खासदारांच्या दारणा बाहेर मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य दिसून आले. संपूर्ण भारत स्वच्छतेकडे वळत असताना धुळ्यातील खासदार दालना बाहेर मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पहायला मिळाले त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गटारी गच्च भरलेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेचे आवाहन केले परंतु त्यांच्याच पक्षाच्या खासदाराच्या दालनाबाहेर मोठी गटार दुमदुमली आहे. एका खासदारांच्या दालनात अशी अवस्था असताना धुळेकर नागरिक कोणाचे आदर्श घेईल व येणाऱ्या काळात धुळे जिल्हा स्वच्छ राहील असा निविश्वास धुळेकर जनतेच्या मनात दिसून येईल अशी खासदारांच्या मतदारसंघात नागरिकांची चर्चा आहे.

## वर्दडी येथे श्रीराम प्राणप्रतिष्ठेनिमित्त भजन-पूजन व महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज

**बुलडाणा :** २२ जानेवारी रोजी आयोजित करण्यात अयोध्येतील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त देशभरातील श्रीराम भक्तांनी आपल्याला गावात, शहरात, नगरात मंदिर परिसर स्वच्छता करुन भजन कीर्तन दिपोत्सव भंडारा करा आदी विषयी माहिती प्रसारित करण्यात आली होती. याच धर्तीवर येथिल ग्रामस्थांनी भजन पूजन व महाप्रसादाचे आयोजन करुन फटाक्यांच्या आतषबाजीने ग्रामप्रदक्षिणा करु सोहळा उत्साहात संपन्न केला. प्रारंभी सकाळी श्री सोमपुरी महाराज संस्थान परिसरातील भागासह प्रदक्षिणा मार्गावर स्वच्छता करण्यात आली होती. दरम्यान सडामर्जन करुन आकर्षक अशा प्रकारे सर्वत्र रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. यानंतर रथ सज्ज करून त्यामध्ये श्रीराम लल्लांची मोठी प्रतिमा ठेवण्यात आली होती. यावेळी अनेक मुलींनी आपल्या डोईवर कलश घेऊन सहभाग नोंदविला होता. भजनी मंडळींच्या टाळ मृदंगाच्या घोशात श्रीराम जयराम जय जय राम श्रीराम जयराम जय जय राम, हनुमंत महाबली दाढी रावणाची जाळी अशा विविध अभांगाद्वारे फटाक्यांच्या आतषबाजीने व भालदार चोपदार यांच्या उपस्थितीत ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली यावेळी शेकडो ग्रामस्थांनी यामध्ये सहभाग नोंदविला होता. यानंतर सायंकाळच्या दरम्यान महाप्रसादाचे वितरण करण्यात सुरूवात करण्यात आली यावेळी समस्त ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी श्रीरामलल्लांच्या नामघोषाने वर्दडी नगरी दुमदुमली होती.





## श्रीराम मंदिर कमानीचे संत आनंदजीवन स्वामींच्या हस्ते झाले उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मंडोरे प्रतिष्ठान, अग्रवंशी ग्रुपने उभारलेल्या यशस्वी युवा उद्योजक,भाजपा नेते चेतन मंडोरे यांच्या मंडोरे प्रतिष्ठाण तसेच पवन अग्रवाल, शाम अग्रवाल व सहकाऱ्यांच्या अग्रवंशी ग्रुपच्या धार्मिक दातृत्वामुळे धुळ्याच्या धार्मिक, सांस्कृतीक वैभवात भर पडली आहे. शहराचे सौंदर्य खुलले आहे. त्यांच्या संकल्पनेतून आग्रारोडवर कराचीवाला खुंटानजीक उभारल्या गेलेल्या श्रीराम मंदिर धाम कमानीने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले आहे. मंडोरे प्रतिष्ठाण, अग्रवंशी ग्रुप यांच्यासह धार्मिक, सामाजीक, सांस्कृतीक कार्यात भर घालणाऱ्या संस्थांनी पुढे येत धुळ्याचे सौंदर्य खुलवावे, धुळ्याच्या वैभवात भर घालावी अशी अपेक्षा धुळेकर नागरीक व्यक्त करीत आहेत. शहरातील आग्रारोडला आता एक नवीन धार्मीक ओळख अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिरात रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेच्या दिवशी मिळाली आहे. अग्रवंशी ग्रुप आणि मंडोरे प्रतिष्ठाण या दोन दानशुर संस्थांच्या माध्यमातून सुमारे पावणे दोनशे वर्ष जुने असलेल्या श्रीराम मंदिरापासून अगदी जवळच असलेल्या गोपाल टी नजीक श्रीराम मंदिर धाम ही भव्य कमान उभारली गेली आहे. या कमानीचे उद्घाटन सोमवार दिनांक २२ जानेवारी रोजी सायंकाळी देवपुरातील प्रसिध्द अशा श्री स्वामी नारायण मंदिराचे संत आनंदजीवन स्वामी, एकविरा देवी मंदिर ट्रस्टचे सोमनाथ गुरव, गणपती मंदिराचे बाळु गुरूजी, श्रीराम मंदिराचे पुजारी, श्रीराम मंदिराचे विश्वस्त अजय नाशिककर, माजी महापौर प्रतिभा चौधरी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, जयश्री अहिरराव, वालीबेन मंडोरे, पवन अग्रवाल, शाम अग्रवाल, श्रीकांत अग्रवाल, सुनिल अग्रवाल, अग्रवंशी गृपचे पवन अग्रवाल, संजय भतवाल यांच्या उपस्थितीत झाले. अग्रवंशी ग्रुप आणि मंडोरे प्रतिष्ठाणच्या या उपक्रमाचे धुळेकरांनी स्वागत करत त्यांचे अभिनंदनही केले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in